हरिः ॐ

श्रीमत्

# संजीवनी गाथा


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १३५७
१९५६




REFBK-0009112

स्वामी

## स्वरूपानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २१४७५ वि: [illegible]
क्रमांक १३६८० नों: दि: २०/२/५८

हरिः ॐ तत् सत्

श्रीमत्

# संजीवनी गाथा

( सचित्र )

श्रीसद्गुरुपर, श्रीहरिरूपपर, ज्ञानभक्तिपर, संतपर, नामपर, उपदेशपर, साधनपर आणि संकीर्ण

## अभंग

लेखक

स्वामी स्वरूपानंद

लेखनकाल : शके १८६७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ७९१२

REFBK-0009112

मराठी ग्रंथ स... 
अनुक्रम .................. विः ..........
क्रमांक .................. नोंः दिः ..........

श्रीज्ञानदेव-पुण्यतिथि

प्रथमावृत्ति

कार्तिक व॥ १३
शके १८७८

१९५६

मूल्य दोन रुपये

प्रकाशक :

देसाई बंधु
मु. पो. पांवस
जि. रत्नागिरी

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

मुद्रक :

स. रा. सरदेसाई,
बी.ए., एल्एल्. बी.
व्यवस्थापक, समर्थ भारत छापखाना,
४१ बुधवार, पुणें नं. २

# गुरु–परंपरा

श्रीज्ञानदेव
( ज्ञानेशो भगवान् विष्णुः )



श्रीरामचंद्र महाराज
( त्रिकुटीकर )



श्रीविश्वनाथ महाराज
( रुकडीकर )



श्रीसद्गुरु गणेशनाथ
( बाबा महाराज वैद्य, पुणेकर )



स्वामी म्हणे माझा नाथसंप्रदाय । अवघें हरिमय योगबळें ॥

मराठी ग्रंथ . . . स्थळप्र
अनुक्रम 29824 वि. 3104
क्रमांक ... 93740 ... नों दि. 7.07.21

# अनुक्रमणिका


**प्रास्ताविक** — पृष्ठ

१. समर्पण .... .... ४
२. प्रकाशकाचें निवेदन .... ६
३. अभंग-सूचि .... .... ११

**संजीवनी गाथा** — पृष्ठ

१. मंगलाचरण .... .... १
२. अभंग ( १ ते २६१ ) .... २
३. श्रीज्ञानदेवांची आरती .... १३६
४. परिशिष्ट .... .... १३७


# चित्र-सूचि


**प्रास्ताविक** — पृष्ठ

१. गुरुपरंपरा .... .... ३
२. स्वामी स्वरूपानंद .... .... १६

**संजीवनी गाथा**

१. सगुण-दर्शन .... .... ५१

— हरिः ॐ —

तत्

सत्

# श्री सद्गुरूचे

## चरण-युगुलीं

सर्वभावें

# समर्पण

— ग्रंथकर्ता —

सद्‌गुरु गणनाथ उदार समर्थ ।
घाली नयनांत ज्ञानांजन ।। १ ।।

सहज समाधि सांपडलें धन ।
लाचावलें मन तया ठायीं ।। २ ।।

चालतां बोलतां न ढळे आसन ।
न भंगे तें मौन कदा काळीं ।। ३ ।।

स्वामी म्हणे लाभे अवीट आनंद ।
लागलासे छंद स्व-रूपाचा ।। ४ ।।

# प्रकाशकाचें निवेदन

ईशकृपेनें **स्वामी स्वरूपानंद** ह्यांनीं लिहिलेला '**श्रीमत् भावार्थगीता**' नांवाचा गीतेचा सुबोध, प्राकृत, टीकात्मक, साकीबद्ध अनुवाद आमचेकडून सुमारें पांच वर्षांपूर्वी प्रकाशित झाला. त्याच्याच कृपेनें स्वामींचा '**श्रीमत् संजीवनी गाथा**' नांवाचा हा दुसरा ग्रंथहि आमचेकडूनच प्रकाशित होण्याचा सुयोग आज येत आहे, हें पाहून आम्हांस धन्यता वाटते.

**स्वामी स्वरूपानंद** हे नाथसंप्रदायी असून गीता-ज्ञानेश्वरीचे एकनिष्ठ उपासक आहेत. नाथपंथी श्रीज्ञानदेवांच्या परंपरेंत मुरलेले पुणें येथील

सत्पुरुष **श्रीसद्गुरु गणेशनाथ ऊर्फ बाबामहाराज वैद्य** ह्यांचेकडून सुमारें तेहत्तीस वर्षांपूर्वी त्यांस अनुग्रह मिळाला. आज सुमारें वीस वर्षें स्वामींचें वास्तव्य आमच्या येथेंच असल्यामुळें त्यांचा सहवास आम्हांस नित्याचाच लाभला आहे.

सुमारें एकवीस वर्षांपूर्वी त्यांस एकाएकीं मृत्यूच्या भयाचा एवढा प्रचंड आघात बसला कीं, क्षणार्धांत त्यांचें शरीर आणि मन हीं अगदीं खिळखिळीं होऊन गेलीं. कित्येक महिनेपर्यंत त्यांस डोळे उघडून जगाकडे पाहण्याचा किंवा क्रमानें दहावीस अंक मोजण्याचाहि ताण वाटावा. अशा स्थितींत गुरूपदिष्ट '**सोऽहम्**' मंत्रच त्यांना एकमेव आधार झाला; आणि तोच आपणास निर्भयत्व देऊन अमृतत्त्वाचा साक्षात्कार घडवील असा दृढ विश्वास बाळगून त्यांनीं सोऽहं-ध्यानांतच तन्मय होण्याचा निश्चय केला. आजहि ते आमच्या येथेंच **श्रवण-मनन-निदिध्यासादि साधनेंत** स्वस्थपणें कालक्रमण करून राहिले आहेत.

प्रस्तुत गाथेतील बहुतेक सर्व अभंग स्वामींनीं सुमारें नऊ दहा वर्षांपूर्वीच लिहिले. ह्या ग्रंथाचें

हस्तलिखित त्यांचेजवळ नेहमींच असावयाचें. स्वामींचे भेटीसाठीं येथें येणाऱ्या कित्येक भाविकांना ह्या गाथेंतील अनेक अभंग स्वामींच्याच मुखांतून श्रवण करण्याचा लाभ झालेला आहे.

स्वामींची प्रकृति अगदींच तोळामासा अशा स्थितींत असते. अंगीं पुरेसें त्राण नाहीं. त्यामुळें त्यांच्यानें फार वेळ हिंडवत नाहीं, फिरवत नाहीं कीं फार वेळ बोलवत नाहीं ! तरीहि भेटीस आलेल्या जिज्ञासूची आस्था लक्षांत घेऊन त्यास त्यांनीं एखादा तरी अभंग तन्मयतेनें म्हणून दाखविला नाहीं, असें सहसा घडत नाहीं.

अनेकांनीं प्रस्तुत गाथेंतील कित्येक अभंग उतरून घेऊन आपल्या संग्रहीं ठेविले आहेत. अनेकांनीं ते मोठ्या आवडीनें वाचले आहेत; पाठ केले आहेत. प्रस्तुत ग्रंथ प्रकाशित झाल्यामुळें **श्रवण-मननार्थ ते संग्रहीं ठेवणें, आतां सर्वांनाच सुलभ झालें आहे.**

अलीकडे स्वामींनीं **'अभंग-ज्ञानेश्वरी'** नांवाचा श्रीज्ञानेश्वरीचा संपूर्ण सुबोध अनुवाद अभंग-वृत्तांत लिहिला आहे. त्याची चरण-संख्या सुमारें **सोळा**

**हजार** झाली आहे. ईशकृपेनें स्वामींचा तो हि ग्रंथ यथावकाश प्रकाशित होईल, असा भरंवसा वाटतो.

स्वामींचे सद्गुरु **श्रीगणेशनाथ ऊर्फ बाबा महाराज वैद्य,** (पुणें); त्यांचे सद्गुरु **श्रीविश्वनाथ महराज श्रीखंडे,** (रुकडीकर); व त्यांचे सद्गुरु **श्रीरामचंद्र महाराज त्रिकुटीकर,** (विजापूर); ह्या त्रिवर्गांचे फोटो ह्या ग्रंथांत छापण्यासाठीं स्वामींचे गुरुबंधु **श्री. गणेश गंगाधर आळेकर,** (पुणें) व स्वामींचे निकटवर्ती सुहृद् **श्रीसंत दिगंबर दास विठ्ठलरावजी जोशी** ह्यांचे उत्कट प्रयत्नानें आम्हांस मिळाले. ह्या उभयतांचे आम्ही सदैव ऋणी आहोंत.

तसेंच ब्लॉक मेकर्स '**जोशी आणि कंपनी**' (पुणें) ह्यांनीं वरील फोटोंचे सुंदर ब्लॉक्स वेळेवर तयार करून ते छापून दिले आणि '**समर्थ भारत छापखान्या**'चे व्यवस्थापक **श्री. स. रा. सरदेसाई,** बी. ए., एलएल. बी., ह्यांनीं ह्या ग्रंथाच्या मुद्रणाचें आणि बांधणीचें काम उत्कृष्टपणें पार पाडलें, त्याबद्दल ह्या उभयतांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. शेवटीं

'सेवितों हा रस वाटितों आणिकां।
घ्यारे होऊं नका रानभरी ॥ १ ॥'

अशी संत तुकोबारायांचे शब्दांत महाराष्ट्रीय बंधुभगिनींना कळकळीची विनंति करून आणि ज्याच्या कृपेनें प्रस्तुत ग्रंथाचें प्रकाशन निर्विघ्नपणें तडीस जाऊन आमचेकडून वाचकवर्गाची अल्पस्वल्प सेवा घडली **त्या जगन्नियंत्याचें भक्तिपूर्वक स्मरण करून** हें निवेदन येथेंच पुरें करीत आहों.

श्रीज्ञानदेव-पुण्यतिथी शके १८७८

**देसाईबंधु**
मु.पो.पांवस, जि. रत्नागिरी

अनुक्रम २९४९५ ३/०५
क्रमांक ९३५५० ता. दि. ९.७१.२५४

# अभंग-सूचि


| अभंग | क्रमांक |
|---|---|
| **अ** | |
| अखंड एकान्त | ९८ |
| अनाथांचा नाथ | १८० |
| अनंत ब्रह्मांडें | ३० |
| असो अश्मयुग | ८२ |
| असो कोणी चोर | १९९ |
| असो यातिहीन | १०१ |
| असो सार्वभौम | २२३ |
| अहो जी उदारा–परिशिष्ट | १ |
| 'अहं देह' वृत्ति | २५५ |
| **आ** | |
| आघवा संसार | १८३ |
| आठ हि प्रहर | १६२ |
| आड येतां विघ्न | २५३ |
| आणिकांतें वाटे | ७६ |
| आणिकांचें सुख | ८६ |
| आतां काय मज का. | ११८ |
| आतां काय मज सं. | ५१ |
| आतां मज एक | १४६ |
| आतां हा चि एक | २९ |
| आदर्शी संसार | २३८ |
| आदरोत कोणी | २११ |
| आदिनाथ सिद्ध–मंगलाचरण | |
| आधीं जेणें केलें–परिशिष्ट | २ |
| आपुल्या मुखींची–परिशिष्ट | ४ |
| आम्हां रात्रंदिन | १३१ |
| आम्ही हरिदास | ७९ |
| आलीं विघ्नें दूर | २५२ |
| आवडीनें भावें | ६८ |
| **उ** | |
| उच्चारितां नाम | २०६ |
| **ए** | |
| एक चि तत्त्वतां | १६१ |
| एक चि हरिरूप | १३५ |
| एक झाला सत्ताधारी | १७० |
| एक वासुदेव | १५१ |
| एकशें छप्पन्न | १५७ |
| **ओ** | |
| ओळखीं स्वरूप | २४२ |
| **अं** | |
| अंगीं वाढे तमोगुण | ८५ |
| अंगीं सत्त्व बळावतां | ८३ |
| अंतरीं भजन | १७१ |
| अंतरीं विरक्ति | १५२ |
| अंतरीं संतत | १५० |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| अंतरीं सन्निध | ११० |
| अंतरीं स्वानंद | ७२ |
| अंतर्बाह्य राम | ३ |
| **क** | |
| कधीं खाई तूपरोटी | ५७ |
| करावा विचार | ९० |
| करी थोडें बोले फार | ४७ |
| करीं गा निष्काम | १४९ |
| कर्तृत्वाचा मद | २४४ |
| कर्म तैसें फळ | ३५ |
| काम क्रोध लोभ ठे. | २१५ |
| काम क्रोध लोभ दार | ५६ |
| काम क्रोध व्यथा | २५८ |
| कामक्रोधादिक | १९३ |
| काय सांगू संत | १२९ |
| कां गा मना होसी | ११५ |
| कां गा माझा तुज | ९४ |
| कां रे प्राण्या जासी | २४० |
| काळ जातो प्रतिक्षण | २४१ |
| काळाची गर्जना | २२४ |
| कृपावंत थोर | १२२ |
| कृपावंत भला | १७ |
| कैंचा आत्मा | २६० |
| कैंचा भक्त | २ |
| कोण पाहे देह | २५१ |
| कोणी भेटो सुष्ट | ३७ |
| कोण मी कोठील | २३४ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| **ख** | |
| खेळविसी तैसा | ११३ |
| **ग** | |
| गुरुकृपेविण | ६५ |
| गुरु तो चि देव | १७५ |
| **घ** | |
| घडे जें स्वभावें | १६५ |
| घरदार अन्न | २०७ |
| घेई घेई जीवा | २३५ |
| घेई ना जें भावें | ११७ |
| घेतां भोग नव्हे | १९४ |
| **च** | |
| चढो पालखींत | १२३ |
| चित्त असों द्यावें | ३८ |
| चित्त शुद्धीचा उपाय | ७० |
| **छ** | |
| छाया तैसा देह | २५७ |
| **ज** | |
| जगीं जो कां बळी | १८४ |
| जनलोक मज | ११४ |
| जनासी घरदार | १६६ |
| जरी तो दर्दुर | २०८ |
| जरी वाटे जीवा | १९१ |
| जरी होय शुद्ध चित्त | २१२ |
| जन्मासंगें मृत्यु | २८ |

| अभंग | क्रमांक |
| --- | --- |
| जन्मोनियां काय | १०४ |
| जन्मोनियां नाहीं केलें | २२७ |
| जन्मोनियां नाहीं सं. | १२७ |
| जाय जाय वेगें | १०५ |
| जीव शिवाचा संयोग | १४ |
| जेथें जेथें माझें | २४६ |
| जेणें अंतरती | २२५ |
| जों जों धरी जीव | १९० |
| **झ** | |
| झाला तरी होवो | १११ |
| झालों ब्रह्म ऐसें | १८७ |
| **त** | |
| तीन पाउलांत | १५८ |
| तुजलागीं मना | १५६ |
| तुझें देहभिन्न | २४३ |
| तो चि एक भक्त | २०४ |
| **द** | |
| दावी चमत्कार | ५५ |
| दीन मी अभागी | १८६ |
| दुःखाचा डोंगर | ८७ |
| देतसे व्याख्यान | ९९ |
| देवपिसा झालों | २२१ |
| देवभक्त आणि नाम | १९ |
| देवा तूं सागर | ९६ |
| देसी तरी देई | २४९ |

| अभंग | क्रमांक |
| --- | --- |
| देह नव्हे ऐसा | २५९ |
| देह पराधीन | १४५ |
| देहाची आसक्ति ठे. | २१७ |
| देहाची आसक्ति बा. | २३३ |
| देहीं उदासीन | १०७ |
| द्यावें तैसें घ्यावें | २३९ |
| **ध** | |
| धरिसील जरी | २४ |
| धर्म अर्थ काम | १२१ |
| ध्येयासाठीं जगूं | १२० |
| **न** | |
| नका बोलों ऐसें | १८५ |
| नको देह-दंड | २४५ |
| नको नको मना गुंतूं | २३७ |
| नको नको मना दु. | १९५ |
| नको नको मना ध. | १८२ |
| नको निराहार | ११६ |
| नको मना होऊं | २०९ |
| नको वेदाभ्यास | ७१ |
| नको व्रत-नेम | ६० |
| नको होऊं मना | २३६ |
| नमो जयजय | १३३ |
| न होती ते भक्त | २०५ |
| नाथ संप्रदायी | १६७ |
| नाथिला अभिमान | १४० |
| नानारूपीं विश्वीं | २५६ |

| अभंग | क्रमांक |
| --- | --- |
| नामजपें जाय | १८८ |
| नामसंकीर्तन | ६९ |
| नामा आणि रूपा- | परिशिष्ट |
| नारायणीं लय | १०२ |
| नाशिवंत देह | ११ |
| नाहीं पोटीं भूतदया | १२६ |
| नांदतों एकला | १०९ |
| निरोगी निर्मळ | १३६ |
| निर्भय निश्चित | ४ |
| निर्वातींचा दीप | १९२ |
| निवडावें जैसें | १४७ |
| नेणे मी वेदान्त | १४४ |
| नेणे विधि ना | ६६ |
| नेति नेति ऐसें | ३९ |
| **प** | |
| पडे त्यासी पडो | ७४ |
| पाहे ज्याची दृष्टी | १७२ |
| पाहें कोण कोणा | १४१ |
| पाहों जातां मूळ | २२० |
| पूर्ण हरिकृपा | ३४ |
| पोटीं एक ओठीं | ८० |
| पोटीं भाव तरी | २१३ |
| प्रकटतां नारायण | २५ |
| प्रपंच विटाळा | ४३ |
| प्रपंचा कारणें | ७३ |
| प्रपंचाचा त्रास | २०१ |
| प्रपंचीं असावें | २०३ |
| प्रपंचीं विचार | ७७ |
| प्रारब्ध संचित | २७ |
| **ब** | |
| बळावतां रजोवृत्ति | ८४ |
| बाह्य सुखालागीं | २२९ |
| बाळकाची भूक | ५९ |
| बाळपणीं खेळ | ५८ |
| बुद्धिमंत काय | १५ |
| बैसुनी विमानीं | ८१ |
| बैसे अधांतरीं | ५४ |
| बैसोनी एकांतीं | २१६ |
| बोलती संतांनीं | १० |
| बोलेन तें होवो | १३५ |
| **भ** | |
| भक्त तो प्रेमळ | १३२ |
| भक्ताचे अंतरीं | १ |
| भक्तासी साचार | १३ |
| भला देवा तुझ्या | १४२ |
| भलें देवा मज | २५० |
| भाग्य हें उदेलें | १३० |
| भाव अंतरीं यथार्थ | १२८ |
| भाविकाची चिंता | १०३ |
| भावें रामकृष्ण | ११२ |
| भावें हरिनाम उ. | ४९ |
| भावें हरिनाम ध. | ५२ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| भासे मृगजळ | १५४ |
| भूत भविष्याचें | २११ |
| **म** | |
| मन अंतरींचा | २०० |
| मन हें चंचळ धांवे | ८९ |
| मन हें चंचळ स्व. | ४५ |
| मना तुजप्रति | १५५ |
| मनासी प्रसन्न | १३४ |
| मागणें हें एक | १९६ |
| माझा प्राण माझी | २१८ |
| माझें मजपाशीं | ८८ |
| मूळ नाभिस्थानीं | ६४ |
| म्हणतां माझा देह | २१९ |
| **य** | |
| येई रखुमाईच्या | २३२ |
| यंत्रयुगें घोर | २३० |
| **र** | |
| रामकृष्ण परमहंस | १६३ |
| रामकृष्ण हरि | ७ |
| रामनाम धरा | ३६ |
| रामनाम येतां | १८९ |
| रामनामीं रंगें | २६१ |
| रूप चतुर्भुज तुवां | ९२ |
| रूप चतुर्भुज सुं. | ९५ |
| रूप तुझें देवा | ९१ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| **ल** | |
| लाभतां अभेद | २३ |
| लोकसेवाव्रत | ११ |
| लोळे विषयांत | २३१ |
| लौकिकाची मात | २५४ |
| **व** | |
| वस्तु सनातन | १३९ |
| वासुदेवमय | १६० |
| वासुदेवाविण | १५९ |
| विवेकाचा गांव | १९७ |
| विश्वासें आपणा | २६ |
| विश्वीं विश्वंभर | २१० |
| विश्वीं विश्वंभर जनीं | २१ |
| विषयीं विरक्ति | १८ |
| वेदवेदांताचें | ५३ |
| वेदान्ताचें सार | ७५ |
| वेदान्ती तो बोले | ४० |
| **श** | |
| शब्दाचें पांडित्य | ९ |
| शरण जातां रमा. | ६ |
| शास्त्रें विद्याकला | १२५ |
| श्वासोच्छ्वासीं देख | २४८ |
| **स** | |
| सखा माझा नारा. | १५३ |
| सगुण निर्गुण एक | ६७ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| सगुण निर्गुण का. | १४८ |
| सत्याचें दर्शन | १२ |
| सदा माझें मन | २२८ |
| सद्गुरुगणनाथ उ. | ५ |
| सद्गुरु गणनाथ द. | १०० |
| सद्गुरु चरण | १७९ |
| सद्गुरुस्वरूप | २१४ |
| सद्वस्तु अव्यक्त | १३८ |
| सर्वसुखें आलीं | ११९ |
| साधकें सर्वदा | १६४ |
| सांगशील तैसा | २४७ |
| सांगा कां गा जावें | १७४ |
| सांगें कां गा जासी | १६९ |
| सांगें प्राण्या कां गा | १७७ |
| सांडुनी फलाशा | ९७ |
| सांपडलें मज | १९८ |
| सेवावा एकांत | ४८ |
| सोडिला संसार | ४६ |
| सोनें आणि लेणें | ४२ |
| सोऽहं सोऽहं ध्यास | १७६ |
| संत ते उदार | १०८ |
| संतांचा सहवास | १४३ |
| संतांची संगति | १०६ |
| संतांसी सद्भावें | १७८ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| स्वच्छंद निर्मळ | ९१ |
| स्वरूप महिमा | १२४ |
| स्वरूपीं तल्लीन | ६३ |
| **ह** | |
| हरीचें चिंतन | २२ |
| हरि तुझी मूर्ति | २२६ |
| हरिध्यान हरिध्यान | ३३ |
| हरिनाम...धर्म | ३१ |
| हरिनाम...वर्म | ३२ |
| हरिनामाचे पवाडे | ५० |
| हरिपायीं धांव | ४१ |
| हरिपायीं लीन | १६ |
| हरिरूप जाण मृत्तिका | १२ |
| हरिरूप जाण व्यापक | ८ |
| हरिरूप ध्याऊं | १६८ |
| हरिरूप ध्यातां | २० |
| हरिरूप सान | ७९ |
| होतां अंतर्यामीं | १७३ |
| होतां कृष्णार्पण | १८१ |
| **क्ष** | |
| क्षणोक्षणीं हाचि | २०२ |
| **ज्ञ** | |
| ज्ञानदेव एकनाथ | ४४ |

# स्वामी स्वरूपानंद

मु. पांवस ] [ जि. रत्नागिरी



स्वामी म्हणे झालें कृतार्थ जीवन । सद्गुरु-चरण उपासितां ॥

# संजीवनी गाथा

## [ मंगलाचरण ]

आदिनाथ सिद्ध आदिगुरु थोर ।
त्यासी नमस्कार भक्ति-भावें ।। १ ।।

तयाचि पासोनी शिव-शक्ति-बीज ।
लाधलें सहज मत्स्येंद्रातें ।। २ ।।

मत्स्येंद्रानें दिलें गोरक्षालागोनी ।
गोरक्षें गहिनी धन्य केला ।। ३ ।।

गहिनीनाथें बोध केला निवृत्तीसी ।
निवृत्ति उपदेशी ज्ञानदेवा ।। ४ ।।

ज्ञानदेव-शिष्य देवचूडामणी ।
पुढें झाले मुनी गुंडाख्यादि ।। ५ ।।

रामचंद्र महादेव रामचंद्र ।
प्रसिद्ध मुनींद्र विश्वनाथ ।। ६ ।।

योग-सार ऐसें परंपराप्राप्त ।
सद्गुरु गणनाथ देई मज ।। ७ ।।

स्वामी म्हणे झालें कृतार्थ जीवन ।
सद्‌गुरु-चरण उपासितां ।। ८ ।।

[ १ ]

भक्ताचे अंतरीं सांवळा श्रीहरी ।
सुखें वास करी सर्वकाळ ॥ १ ॥
म्हणोनी तयासी विश्व हरि-रूप ।
झालें आपेंआप अखंडित ॥ २ ॥
हरि-रूप काया हरि-रूप माया ।
हरि-रूप जाया-पुत्र-वित्त ॥ ३ ॥
हरि-रूप कर्म हरि-रूप धर्म ।
भक्तीचें हें वर्म स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ २ ]

कैंचा भक्त कैंचा देव ।
हरि-रूप झालें सर्व ॥ १ ॥
देव-भक्तां पडे मिठी ।
अंतर्बाह्य जगजेठी ॥ २ ॥
सर्वां ठायीं सर्वां घटीं ।
हरि नांदे पाठींपोटीं ॥ ३ ॥
एक झालें मीतूंपण ।
स्वामी म्हणे भलें मौन ॥ ४ ॥

[ ३ ]

अंतर्बाह्य राम झालों पूर्ण-काम ।
देखियेलें ब्रह्म मूर्तिमंत ॥ १ ॥

आनंदला जीव भेटला केशव ।
गेलों भवार्णव तरोनियां ॥ २ ॥

काम क्रोध लोभ दंभ मोह मान ।
अवघें नारायण-रूप झालें ॥ ३ ॥

काया वाचा मन केलें कृष्णार्पण ।
गेलें मीतूंपण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ४ ]

निर्भय निश्चिंत निवांत निरार्त ।
रतलेंसे चित्त हरिपायीं ॥ १ ॥

सांडिला संसार व्हावया उद्धार ।
केली सारासार-विचारणा ॥ २ ॥

हरि-कृपाबळें लाधला सत्संग ।
सांपडला मार्ग स्वानंदाचा ॥ ३ ॥

स्वामी म्हणे मज आकळलें गुज ।
देखिलें सहज आत्म-रूप ॥ ४ ॥

[ ५ ]

सद्गुरु गणनाथ उदार समर्थ ।
घाली नयनांत ज्ञानांजन ॥ १ ॥

सहज-समाधि सांपडलें धन ।
लाचावलें मन तयाठायीं ॥ २ ॥

चालतां बोलतां न ढळे आसन ।
न भंगे तें मौन कदाकाळीं ॥ ३ ॥

स्वामी म्हणे लाभे अवीट आनंद ।
लागलासे छंद स्वरूपाचा ॥ ४ ॥

[ ६ ]

शरण जातां रमा-वरा ।
सर्व सुखें आलीं घरा ॥ १ ॥

ऋद्धि-सिद्धी उभ्या दासी ।
सदा सादर सेवेसी ॥ २ ॥

धन्य जाहलों संसारीं ।
हरि-रूप नर-नारी ॥ ३ ॥

स्वामी म्हणे सौख्य-कंद ।
वसे अंतरीं गोविंद ॥ ४ ॥

[ ७ ]

राम कृष्ण हरि गोविंद ।
मना लागो हा चि छंद ॥ १ ॥
भक्ति-भावें रात्रं-दिन ।
घडो चित्ता हरि-चिंतन ॥ २ ॥
हरि-नाम पडो कानीं ।
हरि-नाम गर्जो वाणी ॥ ३ ॥
दृष्टिलागीं एक मात्र ।
हरि दिसों दे सर्वत्र ॥ ४ ॥
स्वामी म्हणे सर्वथैव ।
हरिपायीं जडो जीव ॥ ५ ॥

[ ८ ]

हरि-रूप जाण व्यापक संपूर्ण ।
गिळोनि त्रि-गुण राहिलेंसे ॥ १ ॥
जयाचिया पोटीं सामावली सृष्टि ।
नाना जीव-कोटी असंख्यात ॥ २ ॥
शून्याचें जें सार प्रकृति-माहेर ।
अवीट अक्षर परात्पर ॥ ३ ॥
व्याप्य-व्यापकता नुरे चि तत्त्वतां ।
अवघी हरि-सत्ता स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ९ ]

शब्दाचें पांडित्य कल्पनेच्या गोष्टी ।
वाउगी चावटी करूं नये ॥ १ ॥
तेणें पोटीं उठे दंभ अभिमान ।
आत्म-समाधान दूर राहे ॥ २ ॥
गोडी कळावया द्यावा गूळ खाया ।
देव ओळखाया स्वानुभव ॥ ३ ॥
स्वामी म्हणे नाहीं पांडित्याचें काम ।
स्वयें आत्माराम दाखवावा ॥ ४ ॥

[ १० ]

बोलती संतांनीं बुडविला देश ।
भक्तीचा उपदेश करोनियां ॥ १ ॥
कार्य-कारणाचा संबंध जोडिती ।
आपुलाल्या मतीं जैसातैसा ॥ २ ॥
भक्तीनें साचार विश्वाचा उद्धार ।
ऐसा साक्षात्कार मज आला ॥ ३ ॥
स्वामी म्हणे धन्य साधु-संत-जन ।
तयांसी शरण जातां भलें ॥ ४ ॥

[ ११ ]

नाशिवंत देह पुत्र वित्त गेह ।
अल्प हि संदेह नाहीं मज ॥ १ ॥

विश्व सर्व जाण काळाचें भक्ष्यान्न ।
प्रत्यक्ष प्रमाण देखतसें ॥ २ ॥

जारज अंडज स्वेदज उद्भिज्ज ।
जन्म हें चि बीज विनाशाचें ॥ ३ ॥

अज अविनाश हरि-पद एक ।
झालों मी सेवक स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १२ ]

हरि-रूप जाण मृत्तिका पाषाण ।
ग्रह तारांगण हरि-रूप ॥ १ ॥

अथांग सागर अनंत आकाश ।
पवन निःशेष हरि-रूप ॥ २ ॥

मन बुद्धि अहं अष्टधा प्रकृति ।
मूळमाया-व्यक्ति हरि-रूप ॥ ३ ॥

एकला चि हरि नांदे सर्वां घटीं ।
आदि-मध्य-अंतीं स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १३ ]

भक्तांसी साचार विश्वाचा संसार ।
परि अहंकार नसे चित्तीं ॥ १ ॥
स्वयें विश्व-रूप होउनी आपण ।
साधिती कल्याण जगताचें ॥ २ ॥
मोक्ष-रूप हातीं घेउनी संपत्ति ।
जनालागीं देती भक्ति-पंथें ॥ ३ ॥
भक्तीचें भूषण मस्तकीं धारण ।
करी नारायण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १४ ]

जीव-शिवाचा संयोग ।
हाचि माझा राज-योग ॥ १ ॥
भेद-भाव हारपला ।
हरि एकला संचला ॥ २ ॥
दूर झाली आधि-व्याधि ।
लागे अखंड समाधि ॥ ३ ॥
स्वामी बैसला स्व-स्थानीं ।
हरि-रूप ध्यानीं मनीं ॥ ४ ॥

[ १५ ]

बुद्धिमंत काय बोलती तें वायां ।
जनां सौख्य द्याया यंत्र-युग ॥ १ ॥
मुत्सद्दी तों मुखें शांति-पाठ गाती ।
परि युद्धाअंतीं महा-युद्ध ॥ २ ॥
स्फोटक ते गोळे विषारी तो धूर ।
महा-भयंकर रण-गाडे ॥ ३ ॥
कळीचीं विमानें आणि पाण-तीर ।
करिती संहार मानवांचा ॥ ४ ॥
गुरें घरें दारें सु-रम्य नगरें ।
क्षणार्धांत सारें दग्ध होय ॥ ५ ॥
स्वामी म्हणे ऐसी आसुरी संस्कृति ।
करीतसे माती मानव्याची ॥ ६ ॥

[ १६ ]

हरिपायीं लीन झालें माझें मन ।
तेणें समाधान अखंडित ॥ १ ॥
प्राणाचा प्रणव सहज पवन-जय ।
झाला गगनीं लय गगनाचा ॥ २ ॥
गगनाचे पालवें गाळुनी घेतलें ।
तें चि म्यां देखिलें पर-तत्त्व ॥ ३ ॥
स्वामी म्हणे गेला द्रष्टा-दृश्य-भाव ।
कोंदाटला देव अंतर्बाह्य ॥ ४ ॥

[ १७ ]

कृपावंत भला सद्गुरु लाभला ।
अंगीकार केला तेणें माझा ॥ १ ॥
अंतरींची खूण दाखवोनी मज ।
सोऽहं-मंत्र गुज सांगितलें ॥ २ ॥
ठायीं चि लागली अखंड समाधि ।
संपली उपाधि अविद्येची ॥ ३ ॥
स्वामी म्हणे देव सर्वत्र संचला ।
संसार तो झाला मोक्ष-मय ॥ ४ ॥

[ १८ ]

विषयीं विरक्ति दया सर्वां भूतीं ।
हरिपायीं भक्ति एकनिष्ठ ॥ १ ॥
अंतरीं जयातें नित्य समाधान ।
गेले मोह मान सांडोनियां ॥ २ ॥
झाली पर-नारी माउलीसमान ।
आणिकांचें धन विष-तुल्य ॥ ३ ॥
नेणे पर-निंदा न बोले अनृत ।
सर्व-भूत-हित लक्षी सदा ॥ ४ ॥
संताचीं लक्षणें वर्णितां अपार ।
सांगितलें सार स्वामी म्हणे ॥ ५ ॥

[ १९ ]

देव भक्त आणि नाम ।
झाला त्रिवेणी-संगम ॥ १ ॥
करूं भक्ति-भावें स्नान ।
धन्य पावन जीवन ॥ २ ॥
भेद-भाव अमंगळ ।
दूर सारूं या सकळ ॥ ३ ॥
राम-कृष्ण-हरि मंत्र ।
उच्चारूं या अहोरात्र ॥ ४ ॥
भक्त नामीं आनंदला ।
देव अंतरीं तोषला ॥ ५ ॥
देव-भक्तांसी एकांतीं ।
स्वामी म्हणे पडे मिठी ॥ ६ ॥

[ २० ]

हरि-रूप ध्यातां हरि-नाम गातां ।
हरि चि तत्त्वतां झालों आम्ही ॥ १ ॥
आत्म-रूप आतां आघवा संसार ।
ठेली येरझार एकसरां ॥ २ ॥
पावलों नैष्कर्म्य देहीं विदेहत्व ।
डोळां पर-तत्त्व देखियेलें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे राहूं भक्ति-सुखीं लीन ।
हरीसी अर्पून भोग-मोक्ष ॥ ४ ॥

[ २१ ]

विश्वीं विश्वंभर जनीं जनार्दन ।
मानिलें वचन संतांचें हें ॥ १ ॥
सांडोनियां स्वार्थ लोक-सेवा-व्रत ।
आदरिलें येथ आवडीनें ॥ २ ॥
तों चि अवचित भेटला समर्थ ।
स्वामी गणनाथ कृपार्णव ॥ ३ ॥
पूर्णकृपादृष्टी मातें अवलोकी ।
ठेवुनी मस्तकीं कृपा-हस्त ॥ ४ ॥
सोऽहं मंत्र गुज सांगितलें कानीं ।
शब्दाविण ध्वनि ऐकविला ॥ ५ ॥
' तत्त्वमसि ' महा-वाक्य विवरून ।
ॐ काराची खूण दाखविली ॥ ६ ॥
पाहतां पाहतां गेलें देहभान ।
झाली ओळखण स्व-रूपाची ॥ ७ ॥
स्वरूपीं लागली अखंड समाधि ।
आटली उपाधि अविद्येची ॥ ८ ॥
मनाचें उन्मन होतां ध्याता-ध्यान ।
ध्येयीं चि संपूर्ण मिसळलीं ॥ ९ ॥
गेलें मीतूंपण एकला अभिन्न ।
जनीं जनार्दन प्रकटला ॥ १० ॥
स्वामी म्हणे मज ऐसा साक्षात्कार ।
विश्वीं विश्वंभर कोंदाटला ॥ ११ ॥

[ २२ ]

हरिचें चिंतन करीं रात्रं-दिन ।
वाउगा तो क्षण जावों नेदीं ।। १ ।।
चालतां बोलतां जेवण जेवितां ।
सदा देतां घेतां हरि-ध्यान ।। २ ।।
आसनीं शयनीं एकांतीं लोकांतीं ।
आठवीं श्री-पति अखंडित ।। ३ ।।
स्वामी म्हणे नित्य हरिचें दर्शन ।
तेणें समाधान परिपूर्ण ।। ४ ।।

[ २३ ]

लाभतां अभेद-भक्तीचें निधान ।
एक चि आसन जिवा-शिवा ।। १ ।।
न होती विभक्त देव आणि भक्त ।
अंतरीं एकांत एकमेकां ।। २ ।।
स्व-रूपीं अभिन्न तन आणि मन ।
जगीं दुजेपण उरे चि ना ।। ३ ।।
अपार अभेद-भक्तीचें महिमान ।
स्वामी म्हणे खूण ओळखावी ।। ४ ।।

[ २४ ]

धरिसील जरी हरिसी अंतरीं ।
तरी चि संसारीं सुखी होसी ॥ १ ॥
होतां लाभ-हानि प्रियाप्रिय दोन्ही ।
समान मानुनी वर्तें बापा ॥ २ ॥
पुत्र-वित्त-गोत-लौकिकीं समस्त ।
असों दे अलिप्त चित्त सदा ॥ ३ ॥
पाळुनी स्वधर्म भोगीं अर्थ-काम ।
गांठीं मोक्ष-धाम स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ २५ ]

प्रकटतां नारायण ।
विश्व एकरूप जाण ॥ १ ॥
द्विज गज गाय श्वान ।
हीन चांडालादि वर्ण ॥ २ ॥
नर-नारी सखे वैरी ।
भेद-भाव ठेला दूरी ॥ ३ ॥
सोनें मृत्तिका पाषाण ।
सर्व जाहलें समान ॥ ४ ॥
स्वामी म्हणे वासुदेवें ।
विश्व व्यापिलें स्वभावें ॥ ५ ॥

[ २६ ]

विश्वासें आपणां मानिसील थोर।
तरी तूं सत्वर थोर होसी ॥ १ ॥
लेखिसील जरी आपणासी क्षुद्र।
तरी तें अभद्र पाठीं लागे ॥ २ ॥
जो जो मनोभावें करिसील जप।
तें तें आपेंआप तुज प्राप्त ॥ ३ ॥
म्हणोनियां करीं हरिचें चिंतन।
तेणें समाधान स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ २७ ]

प्रारब्ध संचित आणि क्रियमाण।
हरिसी अर्पण करोनियां ॥ १ ॥
सुखें हरिपायीं राहिलों निवांत।
जाहलों निश्चित कर्माकर्मीं ॥ २ ॥
हरि-ध्यान हा चि वर्णाश्रम-धर्म।
तीर्थ व्रत नेम हरि-नाम ॥ ३ ॥
स्वयें आत्माराम वाहे योग-क्षेम।
ऐसें भक्त-प्रेम स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ २८ ]

जन्मासंगें मृत्यु मृत्यूसंगें जन्म।
चक्रनेमिक्रम ऐसा चाले ॥ १ ॥

दिनामागें रात्र रात्रीपाठीं दिन।
घटिकायंत्र जाण निसर्गाचें ॥ २ ॥

सुखापाठीं दुःख दुःखापाठीं सुख।
रहाटी ही देख जगताची ॥ ३ ॥

स्वामी म्हणे स्थिर हरि-पद एक।
तेथें चि निःशंक राहें सदा ॥ ४ ॥

[ २९ ]

आतां हा चि एक आम्हां व्यवसाय।
ध्यावे हरिपाय अंतर्यामीं ॥ १ ॥

संतत सन्मुख असावें श्रीमुख।
नित्य नवें सुख दर्शनाचें ॥ २ ॥

सेवावें आकंठ हरिनामामृत।
भावें व्हावें रत संकीर्तनीं ॥ ३ ॥

प्रेमें हरिसवें बोलावें डोलावें।
अखंड भेटावें स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ३० ]

अनंत ब्रह्मांडें सांठविसी पोटीं।
तो तूं भक्तिसाठीं विकलासी ॥ १ ॥

काय नेणों तुज भक्ति कां आवडे।
अर्जुनाचे घोडे खाजविसी ॥ २ ॥

कां गा तूं बळीचा होसी द्वारपाळ।
रानीं ध्रुव बाळ सांभाळिसी ॥ ३ ॥

होसी विठु धेड फेडिसी तूं देणें।
दामाजीकारणें धांव घेसी ॥ ४ ॥

एकनाथाघरीं वाहसी कां पाणी।
शेले कोण विणी कबिराचे ॥ ५ ॥

चोखामेळ्यासंगें कोण गुरें ओढी।
डेरे कोण घडी गोरोबाचे ॥ ६ ॥

जनाबाईसंगें कोण दळूं लागे।
आवडीनें सांगे गुज-गोष्टी ॥ ७ ॥

स्वामी म्हणे देवा तूं चि विश्वंभर।
भक्तांचा चाकर स्वयें होसी ॥ ८ ॥

[ ३१ ]

हरि-नाम हरि-नाम ।
हाचि वर्णाश्रमधर्म ॥ १ ॥
हरि-नाम हरि-नाम ।
हा चि माझा व्रत-नेम ॥ २ ॥
हरि-नाम हरि-नाम ।
हा चि माझा प्राणायाम ॥ ३ ॥
हरि-नाम हरि-नाम ।
हें चि माझें नित्य-कर्म ॥ ४ ॥
हरि-नाम हरि-नाम ।
हें चि माझें परंधाम ॥ ५ ॥
स्वामी जपे हरि-नाम ।
तेणें अंतरीं विश्राम ॥ ६ ॥

[ ३२ ]

हरि-नाम हरि-नाम ।
संतीं सांगितलें वर्म ॥ १ ॥
हरि गावा हरि ध्यावा ।
ही चि माझी लोक-सेवा ॥ २ ॥
नित्य हरिचें दर्शन ।
तें चि आत्म-पर-कल्याण ॥ ३ ॥
स्वामी म्हणे चराचरीं ।
हरि अंतरीं बाहेरी ॥ ४ ॥

[ ३३ ]

हरि-ध्यान हरि-ध्यान ।
तें चि माझें संध्या-स्नान ॥ १ ॥
हरि-ध्यान हरि-ध्यान ।
तें चि माझें योगासन ॥ २ ॥
हरि-ध्यान हरि-ध्यान ।
तें चि माझें पंचीकरण ॥ ३ ॥
हरि-ध्यान हरि-ध्यान ।
तें चि वेदान्त-श्रवण ॥ ४ ॥
हरि-ध्यान हरि-ध्यान ।
तें चि माझें तत्त्व-ज्ञान ॥ ५ ॥
स्वामी करी हरि-ध्यान ।
तेणें नित्य समाधान ॥ ६ ॥

[ ३४ ]

पूर्ण हरि-कृपा-बळें ।
विश्व-रूप म्यां देखिलें ॥ १ ॥
आतां ठेवूं कोठें पाय ।
हरि-रूप लोक-त्रय ॥ २ ॥
रिता नाहीं कोठें ठाव ।
जेथें पाहें तेथें देव ॥ ३ ॥
स्वामी हरिसी अभिन्न ।
अवघा हरि परिपूर्ण ॥ ४ ॥

[ ३५ ]

कर्म तैसें फळ लाभतें केवळ ।
आणिकांतें बोल लावूं नये ॥ १ ॥
पेरोनियां साळी गव्हाचें तें पीक ।
घ्यावया निःशंक धावूं नये ॥ २ ॥
उत्तरासारिखें येतें प्रत्युत्तर ।
करावा विचार आपणाशीं ॥ ३ ॥
पहावें तें दिसे दर्पणीं साचार ।
आपुला आचार चोखाळावा ॥ ४ ॥
स्वामी म्हणे होसी सर्वथैव जाण ।
तुझा तूं कारण सुख-दुःखा ॥ ५ ॥

[ ३६ ]

राम-नाम धरा कंठीं ।
पाप जाय उठाउठीं ॥ १ ॥
नामें पाषाण तारिले ।
नामें पापी उद्धरिले ॥ २ ॥
नाम जपे वाल्या कोळी ।
धन्य झाला भू-मंडळीं ॥ ३ ॥
नामें तारिली पिंगला ।
अजामीळ मुक्त केला ॥ ४ ॥
राम-नाम बीज-मंत्र ।
स्वामी जपे अहोरात्र ॥ ५ ॥

दा. क्र.

[ ३७ ]

कोणी भेटो सुष्ट दुष्ट ।
सदा असावें संतुष्ट ॥ १ ॥

मान तैसा अपमान ।
मनीं लेखावा समान ॥ २ ॥

प्राप्त होतां सुख-दुःख ।
नये मानूं हर्ष-शोक ॥ ३ ॥

उठावतां काम-क्रोध ।
चित्त न व्हावें प्रक्षुब्ध ॥ ४ ॥

स्वामी म्हणे प्रतिक्षण ।
आत्म-रूपीं अनुसंधान ॥ ५ ॥

[ ३८ ]

चित्त असों द्यावें निवांत प्रसन्न ।
कल्पांतीं हि खिन्न होऊं नये ॥ १ ॥

अंतरीं असावा अखंड उल्हास ।
आपत्तीचा त्रास मानूं नये ॥ २ ॥

संसारीं रहावें अलिप्त उदास ।
मोहें माया-पाश जोडूं नये ॥ ३ ॥

स्वामी म्हणे व्हावा ईश्वरीं विश्वास ।
संतांचा सहवास सोडूं नये ॥ ४ ॥

[ ३९ ]

'नेति' 'नेति' ऐसें बोलती ते वेद ।
जाहले निःशब्द पर-तत्त्वीं ॥ १ ॥
मोकळें ना बद्ध एकलें ना दुजें ।
नांदतें सहजें आत्म-पणें ॥ २ ॥
शून्य ना संपूर्ण मूर्त ना अमूर्त ।
भावाभावातीत महा-शून्य ॥ ३ ॥
तें चि आम्हां भलें अंतरीं लाभलें ।
गुरु-कृपा-बळें स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ४० ]

वेदांती तो बोले सृष्टी मिथ्या ऐसें ।
भक्ता ती चि दिसे हरि-रूप ॥ १ ॥
वेदांती ओळखे मिथ्या मायाभास ।
हरिचा विलास भक्त म्हणे ॥ २ ॥
दोहींचा भावार्थ सारिखा तत्त्वतां ।
एक चि हरि-सत्ता सर्वां ठायीं ॥ ३ ॥
भक्त तो चि ज्ञानी ज्ञानी तो चि भक्त ।
जाणावा सिद्धान्त स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ४१ ]

हरिपायीं धांव घेतां उठाउठीं ।
आड उभे ठाती काम-क्रोध ॥ १ ॥
असों द्यावा चित्तीं एकनिष्ठ भाव ।
भक्तालागीं देव सांभाळितो ॥ २ ॥
स्वयें जगन्नाथ साधकाचा हात ।
धरोनियां नीट चालवितो ॥ ३ ॥
साधकाकारणें घडे हें बोलणें ।
ज्याचें तोचि जाणे स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ४२ ]

सोनें आणि लेणें एक चि तत्त्वतां ।
तैसी आत्म-सत्ता विश्व-रूप ॥ १ ॥
तरंग सागर एक चि साचार ।
तैसा विश्वाकार आत्म-मय ॥ २ ॥
ज्वाला आणि अग्न एक चि संपूर्ण ।
भूतांसी अभिन्न आत्म-तत्त्व ॥ ३ ॥
स्वामी म्हणे जैसा कापुरीं सुवास ।
तैसा श्रीनिवास विश्वीं वसे ॥ ४ ॥

[ ४३ ]

प्रपंच-विटाळापासुनी मोकळा ।
झालों मी सोवळा आत्म-रूप ॥ १ ॥

नाम रूप कुळ सांडोनी सकळ ।
झालों मी केवळ आत्म-रूप ॥ २ ॥

भेद-भाव मळ गेला अमंगळ ।
झालों मी निर्मळ आत्म-रूप ॥ ३ ॥

जळांत कमळ तैसा उपाधींत ।
राहतों अलिप्त स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ४४ ]

ज्ञानदेव एकनाथ ।
आले स्वामी रामतीर्थ ॥ १ ॥

तुकाराम रामदास ।
रामकृष्ण परमहंस ॥ २ ॥

माता शारदा तापसी ।
आली जगदंबादासी ॥ ३ ॥

स्वामी विवेकानंद हे ।
आले मथुरबाबू पाहें ॥ ४ ॥

मेहेरबाबा उपासनी ।
आले भक्त योगीमुनी ॥ ५ ॥

आला खिस्त आला बुद्ध ।
आला महात्मा प्रसिद्ध ॥ ६ ॥

जगद्‌गुरु कृष्णमूर्ति ।
प्रभु गौरांगप्रभृति ॥ ७ ॥

साधु संत भक्त यती ।
नित्यनेमें येथें येती ॥ ८ ॥

प्रेमें पासीं बैसवितों ।
आप्त मित्र पाचारितों ॥ ९ ॥

आणि तयांचे संगतीं ।
गुरु सांगती त्या रीती ॥ १० ॥

ठेवोनियां भाव-भक्ति ।
हरिपाय ध्यातों चित्तीं ॥ ११ ॥

गेलें गेलें देह-भान ।
हरिपायीं झालों लीन ॥ १२ ॥

स्वामी म्हणे ध्याता ध्यान ।
हरि-रूप परिपूर्ण ॥ १३ ॥

[ ४५ ]

मन हें चंचळ स्वभावें ओढाळ ।
धांवे रानोमाळ आवरे ना ॥ १ ॥

गांजितो संसार सोशितो जोजार ।
परी अहंकार वोसरे ना ॥ २ ॥

स्व-रूपीं आनंद असे स्वयं-सिद्ध ।
धुंडाळी मोहांध आढळे ना ॥ ३ ॥

गुरु-कृपेविण आकळे ना खूण ।
व्हावें सावधान स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ४६ ]

सोडिला संसार जोडिला संन्यास ।
पालटिला वेष बाह्यात्कारीं ॥ १ ॥

अंतरीं मी-माझें बाळगिलें ओझें ।
तरी ती सहजें विटंबना ॥ २ ॥

वाटला संन्यास घ्यावा ज्याकारणें ।
तेथें लक्ष उणें कामा नये ॥ ३ ॥

स्वामी म्हणे मन होतां कृष्णार्पण ।
संसारीं असोन संन्यासी तो ॥ ४ ॥

[ ४७ ]

करी थोडें बोले फार ।
त्याचा बुडाला संसार ॥ १ ॥
वस्तु विकी जो उधार ।
त्याचा बुडाला व्यापार ॥ २ ॥
विचारी ना सारासार ।
त्याचा बुडाला आचार ॥ ३ ॥
स्वामी म्हणे अहंकार ।
तेथें कैंचा आत्मोद्धार ॥ ४ ॥

[ ४८ ]

सेवावा एकांत सुखें वारंवार ।
जनासंगें फार बोलों नये ॥ १ ॥
आणिकांची निंदा नायकावी कानीं ।
पर-द्रव्य मनीं आणों नये ॥ २ ॥
पर-स्त्रीचे ठायीं सदा मातृ-भाव ।
असों द्यावा ठाव दयेलागीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे दक्ष रहावें साधनीं ।
सद्भावें लक्षोनी हरिपाय ॥ ४ ॥

[ ४९ ]

भावें हरि-नाम उच्चारितां वाचे ।
कोटीकल्मषांचें भस्म होय ॥ १ ॥

हरि-नाम मंत्र जपा अहोरात्र ।
अंतरीं पवित्र तेणें तुम्ही ॥ २ ॥

सानंद सोल्हास करा नाम-घोष ।
तेणें भव-पाश दूर होय ॥ ३ ॥

चुके अधोगति लाभे चिर-शांति ।
जीवासी विश्रांति स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ५० ]

हरि-नामाचे पवाडे ।
गातां सनकादिक वेडे ॥ १ ॥

तेथें मी एक बापुडें ।
किती गाऊं वाडेंकोडें ॥ २ ॥

हरि-नामाची महती ।
गातां वेद मौनावती ॥ ३ ॥

तेथें काय माझी मति ।
स्वामी म्हणे वर्णूं किती ॥ ४ ॥

[ ५१ ]

आतां काय मज संन्यासाचें काज ।
निजांतरीं गुज प्रकटलें ॥ १ ॥

प्रकटतां घडे सहज-संन्यास ।
नैष्कर्म्य-पदास गांठियेलें ॥ २ ॥

करोनि अकर्ता भोगोनि अभोक्ता ।
विश्वीं आत्म-सत्ता नांदतसे ॥ ३ ॥

स्वामी म्हणे आतां जाहलों निःसंग ।
त्याग आणि भोग दूर ठेले ॥ ४ ॥

[ ५२ ]

भावें हरि-नाम धरिसील कंठीं ।
तरी चि वैकुंठीं वास घडे ॥ १ ॥

एक वेळ पडे हरि-नाम कानीं ।
पातकांची खाणी दग्ध होय ॥ २ ॥

हरि-नाम सार हरि-नाम सार ।
तेणें चि भव-पार पावसील ॥ ३ ॥

स्वामी म्हणे अंतीं हरि-नाम एक ।
तारील निःशंक तुजलागीं ॥ ४ ॥

[ ५३ ]

वेद-वेदांताचें संपादुनी ज्ञान ।
　　देतसे व्याख्यान लोकांपुढें ॥ १ ॥
अद्वैत-वेदांत मांडितो सिद्धांत ।
　　देउनी दृष्टांत नानाविध ॥ २ ॥
भला थोर ज्ञाता ऐसी कीर्ति होतां ।
　　आला स्वर्ग हाता ऐसें वाटे ॥ ३ ॥
स्वामी म्हणे नाहीं आत्म-समाधान ।
　　व्यर्थ अभिमान पांडित्याचा ॥ ४ ॥

[ ५४ ]

बैसे अधांतरीं उभा अग्नीवरी ।
　　सांगे देशांतरीं काय चाले ॥ १ ॥
बोले तें तें घडे ऐसे चि रोकडे ।
　　दावी लोकांपुढें चमत्कार ॥ २ ॥
वश केल्या सिद्धी पावला प्रसिद्धि ।
　　लागली उपाधि लौकिकाची ॥ ३ ॥
स्वामी म्हणे नाहीं आत्म-साक्षात्कार ।
　　काय चमत्कार दावोनियां ॥ ४ ॥

[ ५५ ]

दावी चमत्कार त्यासी नमस्कार ।
लोक-व्यवहार ऐसा असे ॥ १ ॥
स्वभावें साचार रची चराचर ।
त्याचा जयजयकार कोण करी ॥ २ ॥
स्व-रूपीं विलीन साधु-संत-जन ।
तयांचे चरण कोण धरी ॥ ३ ॥
स्वामी म्हणे जना कृत्रिमाची गोडी ।
नसे चि आवडी स्वाभाविकीं ॥ ४ ॥

[ ५६ ]

काम-क्रोध-लोभ दार हें तिहेरी ।
घोर यम-पुरी पाववितें ॥ १ ॥
तेणें आत्म-नाश होतसे निभ्रांत ।
सांगतो श्री-कांत गीतेमाजीं ॥ २ ॥
सोडी आडवाट धरी जो सत्पंथ ।
दृढ-भावें चित्त देवोनियां ॥ ३ ॥
आत्म्याचें कल्याण साधुनी तो जाण ।
पावतो निर्वाण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[५७]

कधीं खाई तूप-रोटी ।
कधीं राहे अर्धपोटी ॥ १ ॥

कधीं झोंपे गादीवरी ।
कधी घोंगडी अंथरी ॥ २ ॥

कधीं लोकरीची शाल ।
कधीं पांघरी वाकळ ॥ ३ ॥

कधीं हवेली सुंदर ।
कधीं चंद्र-मौळी घर ॥ ४ ॥

कधीं सज्जनांची भेटी ।
कधीं नाठाळाशीं गांठी ॥ ५ ॥

कधीं गळां पुष्प-हार ।
कधीं निंदेचा भडिमार ॥ ६ ॥

कधीं सुखाचा संसार ।
कधीं हिंडे दारोदार ॥ ७ ॥

स्वामी म्हणे आत्म-स्थित ।
संत सुखदुःखातीत ॥ ८ ॥

[ ५८ ]

बाळपणीं खेळ यौवनीं विलास ।
वार्धक्यीं जीवास व्याधि-चिंता ॥ १ ॥
बाळपणीं शाळा तारुण्यीं संसार ।
वार्धक्यीं जोजार तयाचा चि ॥ २ ॥
जन्मुनियां वायां कष्टविली काया ।
स्व-हित साधाया वेळ नाहीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मोहें विसरला देवा ।
तयासी विसावा कैंचा अंतीं ॥ ४ ॥

[ ५९ ]

बाळकाची भूक कळे माउलीतें ।
बोलावुनी देते स्तन-पान ॥ १ ॥
तैसें माझें हित जाणे जगन्नाथ ।
तेणें मी निश्चिंत सर्वकाळ ॥ २ ॥
भाव-बळें देव आपुलासा केला ।
कृपाळु तो मला सांभाळितो ॥ ३ ॥
स्वामी म्हणे खेळ खेळतों लडिवाळ ।
खेळवी गोपाळ प्रेम-भरें ॥ ४ ॥

[ ६० ]

नको व्रत नेम नको तीर्थाटन ।
हरीसी शरण जाय वेगें ॥ १ ॥
नको योग-याग नको भोग-त्याग ।
हरि-नाम चांग दृढ धरीं ॥ २ ॥
नको मंत्र-तंत्र नको कर्म-धर्म ।
घेईं हरि-नाम भक्ति-भावें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे नको नाना देह-दंड ।
चालवीं अखंड नाम-घोष ॥ ४ ॥

[ ६१ ]

लोक-सेवा-व्रत आचरिती भावें ।
तयांतें मानावें भाग्यवंत ॥ १ ॥
लोक-सेवेसाठीं सत्यातें स्मरून ।
करिती ते दान सर्वस्वाचें ॥ २ ॥
त्या चि सेवा-व्रतें तोषे जगन्नाथ ।
शुद्ध करी चित्त सेवकाचें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे तेणें लाभे आत्म-ज्ञान ।
जनीं जनार्दन प्रकटतो ॥ ४ ॥

[ ६२ ]

सत्याचें दर्शन घडावें संपूर्ण ।
ध्येय हें लक्षून जीवनाचें ॥ १ ॥
प्रेम-अहिंसेचें घेवोनियां व्रत ।
लोक-सेवा-रत राहे सदा ॥ २ ॥
शस्त्राविण करी दुष्टाचा प्रतिकार ।
न घेई माघार प्राणान्तीं हि ॥ ३ ॥
स्वामी म्हणे तया होउनी प्रसन्न ।
देई जनार्दन शांति-सुख ॥ ४ ॥

[ ६३ ]

स्व-रूपीं तल्लीन साधु-संत-जन ।
अंतरीं प्रसन्न अखंडित ॥ १ ॥
निंदा आणि स्तुति समान लेखिती ।
सोनें आणि माती एकरूप ॥ २ ॥
नाहीं माया-पाश नाहीं राग-द्वेष ।
नाहीं तयां क्लेश संसाराचा ॥ ३ ॥
स्वामी म्हणे विश्वीं नाहीं दुजेपण ।
सर्वत्र संपूर्ण आत्म-रूप ॥ ४ ॥

[ ६४ ]

मूळ नाभि-स्थानीं जन्म पावे ध्वनि ।
ती चि परा वाणी ओळखावी ॥ १ ॥
हृदयीं चि जाण पश्यन्तीचें स्थान ।
कंठीं ओळखण मध्यमेची ॥ २ ॥
मुखें जो उच्चार वैखरी साचार ।
ऐशा वाणी चार जाणोनियां ॥ ३ ॥
परेहुनी पर राहे परात्पर ।
पाहें निरंतर स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ६५ ]

गुरुकृपेविण नाहीं आत्म-ज्ञान ।
वाउगा तो शीण साधनांचा ॥ १ ॥
सहज-साधन गुरु-कृपा जाण ।
जीवाचें कल्याण तेणें होय ॥ २ ॥
गुरु माता पिता गुरु चि देवता ।
गुरु मुक्ति-दाता ऐसें मानीं ॥ ३ ॥
गुरु-सेवेविण जावों नेदीं क्षण ।
तेणें तो प्रसन्न स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ६६ ]

नेणे विधि ना निषेध ।
नेणे पाप-पुण्य-बंध ॥ १ ॥
नेणे लौकिक-संबंध ।
जगीं वागतो स्वच्छंद ॥ २ ॥
घर दार ना संसार ।
सदा राहे निराधार ॥ ३ ॥
स्वामी म्हणे संत-जन ।
तया कैचें जगद्भान ॥ ४ ॥

[ ६७ ]

सगुण-निर्गुण एकरूप जाण ।
ओळखावी खूण स्वानुभवें ॥ १ ॥
नित्य निराकार निर्गुण एकलें ।
तें चि प्रकटलें विश्व-रूपें ॥ २ ॥
बीजीं सामावला वृक्षाचा विस्तार ।
तैसें चराचर निराकारीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे ज्वाळा वह्नीसी अभिन्न ।
सगुण-निर्गुण तैसें मानीं ॥ ४ ॥

[ ६८ ]

आवडीनें भावें हरि-नाम गावें ।
निर्लज्ज नाचावें संकीर्तनीं ॥ १ ॥
रंगतां कीर्तनीं लागते समाधि ।
होते योग-सिद्धि अनायासें ॥ २ ॥
नसे तरी नसो वेदान्ताचें ज्ञान ।
नाम-संकीर्तन सोडूं नये ॥ ३ ॥
स्वामी म्हणे भावें आकळे वेदान्त ।
भेटे मूर्तिमंत पर-ब्रह्म ॥ ४ ॥

[ ६९ ]

नाम-संकीर्तन जीवासी आवडे ।
मन-बुद्धि जडे हरि-पायीं ॥ १ ॥
हरि-नामापुढें अमृत थोकडें ।
तुच्छ तें बापुडें स्वर्ग-सुख ॥ २ ॥
नको कर्म-कांड नको ब्रह्म-ज्ञान ।
नको न्यावा प्राण ब्रह्मांडातें ॥ ३ ॥
भाव-बळें आम्हां हरिचें दर्शन ।
नित्य समाधान स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ७० ]

चित्त-शुद्धीचा उपाय ।
सदा चिंतावे हरि-पाय ॥ १ ॥
पोटीं व्हावा अनुताप ।
मुखें हरि-नाम-जप ॥ २ ॥
हरि-नाम गातां गीतीं ।
होय पापाची निष्कृति ॥ ३ ॥
चित्तीं उपजे सद्भाव ।
स्वामी म्हणे भेटे देव ॥ ४ ॥

[ ७१ ]

नको वेदाभ्यास करावा सायास ।
उपास-तापास देह-दंड ॥ १ ॥
नको धूम्र-पान पंचाग्नि-साधन ।
नको तीर्थाटन काशी गया ॥ २ ॥
नको मंत्र-तंत्र जप-जाप्य अर्चा ।
वेदान्ताची चर्चा करावया ॥ ३ ॥
अखंड अंतरीं सहज-स्फुरण ।
तेथें ठेवीं मन स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ७२ ]

अंतरीं स्वानंद असे स्वयं-सिद्ध ।
परि मति-मंद भोगी चि ना ॥ १ ॥
समाधि-निधान असतां सन्निध ।
झालासे मोहांध पाहे चि ना ॥ २ ॥
अखंड भजन चाले रात्रं-दिन ।
तेथें सावधान राहे चि ना ॥ ३ ॥
सद्‌गुरुवांचून नाहीं आत्म-ज्ञान ।
जाईना शरण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ७३ ]

प्रपंचाकारणें केली आटापीट ।
परी यातायात चुके चि ना ॥ १ ॥
माझें माझें म्हणुनी बांधियलें गांठीं ।
परी तें शेवटीं कामा नये ॥ २ ॥
कन्या पुत्र वित्त आप्त गण-गोत ।
सांडुनी समस्त जावें लागे ॥ ३ ॥
हरि-नाम एक येईल सांगातीं ।
तारील तें अंतीं स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ७४ ]

पडे त्यासी पडो विश्वाचें हें कोडें ।
आम्हांसी उघडें आत्म-रूप ॥ १ ॥
एक आत्म-रूप सर्वत्र संचलें ।
नाहीं त्यावेगळें दुजें कांहीं ॥ २ ॥
जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं संपूर्ण ।
आत्म-रूप जाण प्रकटलें ॥ ३ ॥
आत्म-रूप दृष्टि आत्म-रूप सृष्टि ।
आत्मा पाठींपोटीं स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ७५ ]

वेदान्ताचें सार सांगतों साचार ।
नका वारंवार पुसों आतां ॥ १ ॥
सत्य एक आत्मा नित्य निर्विकार ।
जाणा चराचर मायाभास ॥ २ ॥
दिसे जें लोचना भासे जें जें मना ।
तें तें मिथ्या जाणा माया-रूप ॥ ३ ॥
विश्व आणि आत्मा एक चि अभिन्न ।
जाणा ही चि खूण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ७६ ]

आणिकांतें वाटे संसाराचें भय ।
आम्हांसी तो होय सुख-रूप ॥ १ ॥
संतत अंतरीं राहे श्रीगोपाळ ।
बापुडा तो काळ आम्हांपुढें ॥ २ ॥
सेवेसाठीं सुखें साहूं गर्भवास ।
होऊं हरि-दास जन्मोजन्मीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे भावें करूं संकीर्तन ।
सवें थोर-सान घेवोनियां ॥ ४ ॥

[ ७७ ]

प्रपंचीं विचार करीं सारासार ।
राहें निरंतर सावधान ॥ १ ॥
स्वभावतां पावे जें जें सुख-दुःख ।
त्याचा हर्ष-शोक मानूं नको ॥ २ ॥
प्रसंगीं असावें अंगीं धैर्य-बळ ।
लोभें उतावीळ होऊं नको ॥ ३ ॥
स्वधर्मानुसार वर्तोनी साचार ।
होईं भव-पार स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ७८ ]

आम्ही हरि-दास प्रपंचीं उदास ।
आम्हां निदिध्यास श्रीहरिचा ॥ १ ॥
जनीं मनीं एक हरि-रूप पाहूं ।
हरि-गुण गाऊं आवडीनें ॥ २ ॥
नाम-संकीर्तनीं हरिसंगें डोलूं ।
भाव-बळें बोलूं गुज-गोष्टी ॥ ३ ॥
ऐकूं हरि-गीत सेवूं नामामृत ।
भेटूं अखंडित स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ७९ ]

हरि-रूप सान हरि-रूप थोर ।
नाहीं पारावर हरि-रूपा ॥ १ ॥
हरि-रूप येथें हरि-रूप तेथें ।
व्यापुनी सर्वांतें हरि राहे ॥ २ ॥
स्वरूपीं अरूप असे हरि-रूप ।
विश्वीं विश्व-रूप हरि दिसे ॥ ३ ॥
सगुण-निर्गुण हरि-रूप जाण ।
एक चि परिपूर्ण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ८० ]

पोटीं एक ओठीं दुजें ।
हें तों घातक सहजें ।। १ ।।
जरी वाटे लाभ झाला ।
नव्हे परिणामीं तो भला ।। २ ।।
सत्य बोलाया कारणें ।
मनोधैर्य संपादणें ।। ३ ।।
तुज कशाचें गा भय ।
कोण नेतें तुझें काय ।। ४ ।।
करीं बुद्धीचा निश्चय ।
अंतीं सत्याचा विजय ।। ५ ।।
स्वामी म्हणे सत्याचरण ।
देई आत्म-समाधान ।। ६ ।।

[ ८१ ]

बैसुनी विमानीं आकाशीं उड्डाण ।
करूं येतें जाण यंत्र-युगीं ।। १ ।।
हिंडविती नौका सागराच्या पोटीं ।
विद्युतद्वारा देती संदेश ते ।। २ ।।
साधाया कल्याण नाना शोध जाण ।
लाविती विज्ञान-शास्त्रवेत्ते ।। ३ ।।
अंतरीं सद्भाव असेल जागृत ।
तरी यंत्रें हित स्वामी म्हणे ।। ४ ।।

[ ८२ ]

असो अश्म-युग असो यंत्र-युग ।
आम्हां नित्य योग हरिपायीं ॥ १ ॥
हरि हा प्राचीन हरि अर्वाचीन ।
हरि चिरंतन एकला चि ॥ २ ॥
हरि तळीं वरी हरि मागें पुढें ।
हरि चोहींकडे अंतर्बाह्य ॥ ३ ॥
अमूर्ताची मूर्ति आदि-मध्य-अंतीं ।
हरि सर्वां भूतीं स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ८३ ]

अंगीं सत्त्व बळावतां ।
देव-दर्शनीं उत्कंठा ॥ १ ॥
होय ज्ञानाची जागृति ।
होय सद्भावाची स्फूर्ति ॥ २ ॥
विषय-भोग नावडती ।
रुचे संतांची संगति ॥ ३ ॥
लौकिकाचा वाटे त्रास ।
सुख एकांतीं जीवास ॥ ४ ॥
सहज बाणे सदाचार ।
अंतीं आत्म-साक्षात्कार ॥ ५ ॥
सत्त्व-गुणाचीं लक्षणें ।
ऐसीं जाण स्वामी म्हणे ॥ ६ ॥

[ ८४ ]

बळावतां रजोवृत्ति ।
होय कर्माची प्रवृत्ति ॥ १ ॥
उठावती काम-क्रोध ।
जीव होतसे मदांध ॥ २ ॥
पोटीं लोभ अनिवार ।
न देखे तो सारासार ॥ ३ ॥
मांडी कर्माचा पसारा ।
नसे सुख-संतोषा थारा ॥ ४ ॥
स्वामी म्हणे रजोगुण ।
दुःख देतसे दारुण ॥ ५ ॥

[ ८५ ]

अंगीं वाढे तमोगुण ।
तदा फांकतें अज्ञान ॥ १ ॥
जीव होय मोह-ग्रस्त ।
लक्ष नाहीं राहे सुस्त ॥ २ ॥
मंद आळशी खादाड ।
सदा निद्रेची झांपड ॥ ३ ॥
कर्म करी तें प्रमाद ।
किती होती नाहीं शुद्ध ॥ ४ ॥
स्फूर्तिहीन अंतःकरण ।
स्वामी म्हणे तो पाषाण ॥ ५ ॥

[ ८६ ]

आणिकांचें सुख देखोनि जो सुखी ।
होय धन्य लोकीं तो चि संत ॥ १ ॥
आणिकांचें दुःख देखोनियां डोळां ।
येई कळवळा तो चि संत ॥ २ ॥
आणिकांचे दोष आणी ना जो मनीं ।
गुणांतें वाखाणी तो चि संत ॥ ३ ॥
लोक-कल्याणार्थ वेंची जो जीवित ।
संत तो महंत स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ८७ ]

दुःखाचा डोंगर आदळो का शिरीं ।
जयासी अंतरीं खेद नाहीं ॥ १ ॥
प्राप्त झाली सिद्धि पावला समृद्धि ।
तरी आत्म-बुद्धी भंग नाहीं ॥ २ ॥
नेणे निंदा-स्तुति नेणे भव-भ्रांति ।
राहे आत्म-स्थिति अखंडित ॥ ३ ॥
नित्य आत्म-तृप्त निर्भय निश्चिंत ।
तो चि प्रज्ञावंत स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ८८ ]

माझें मजपाशीं सांपडलें धन ।
आनंदलें मन आत्म-रंगीं ॥ १ ॥
सोडवेना मज नित्य नवी गोडी ।
सेवितों आवडी ब्रह्म-रस ॥ २ ॥
सन्निध तें परी होतें दुरावलें ।
गुरु-कृपा-बळें आंगवलें ॥ ३ ॥
प्राणाचा प्रणव मनाचें उन्मन ।
होतां समाधान स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ८९ ]

मन हें चंचळ धांवे वाऱ्यावरी ।
तयासी आवरीं अभ्यासानें ॥ १ ॥
विषयांचें सुख नाशिवंत देख ।
अविनाशी एक आत्म-रूप ॥ २ ॥
ऐसा सारासार करावा विचार ।
सार तें साचार दाखवावें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मना आत्म-सुखीं गोडी ।
लावितां आवडी स्थिरावेल ॥ ४ ॥

[ ९० ]

करावा विचार आपुला आपण ।
कोण मी कोठून जन्मा आलों ॥ १ ॥
जन्मोनियां काय करावें उचित ।
बरवें हिताहित विचारावें ॥ २ ॥
देहान्तीं मागुतें कोठें जाणें असे ।
काय विश्व कैसें होय जाय ॥ ३ ॥
स्वामी म्हणे यत्नें ऐसा घेतां शोध ।
होतसे प्रबोध अंतर्यामीं ॥ ४ ॥

[ ९१ ]

स्वच्छंद निर्मल वाहतो निर्झर ।
आम्हां साक्षात्कार गोविंदाचा ॥ १ ॥
करी गुंजारव पंकजीं भ्रमर ।
आम्हांसी गजर हरि-नामाचा ॥ २ ॥
उद्यानीं कोकिळ गातसे संगीत ।
आम्हां हरि-गीत आवडे तें ॥ ३ ॥
अखंड गंभीर गर्जतो सागर ।
आम्हां सोऽहं-स्वर स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[९२]

रूप चतुर्भुज तुवां चक्र-पाणीं ।
ध्रुवा मधु-वनीं दाविलें जें ॥ १ ॥

तें चि देखावया भुकेले हे डोळे ।
काय सांगों झाले उतावीळ ॥ २ ॥

लडिवाळपणें घेतलीसे आळी ।
बाळ मी माउली तूं चि माझी ॥ ३ ॥

तुजपासीं आतां काय धरूं भीड ।
पुरवीं माझे लाड स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[९३]

रूप तुझें देवा दाखवीं केशवा ।
मुकुंदा माधवा नारायणा ॥ १ ॥

अच्युता अनंता कृष्ण दामोदरा ।
गोविंदा श्रीधरा हृषीकेशा ॥ २ ॥

हरि जनार्दना रुक्मिणी-रमणा ।
देवकी-नंदना वासुदेवा ॥ ३ ॥

स्वामी म्हणे मज हा चि निदिध्यास ।
पूर्ण करीं आस दर्शनाची ॥ ४ ॥

श्री भगवान् विष्णु



शंख चक्र गदा पद्म करीं शोभे। सन्मुख हें उभें स्वामी म्हणे।।

आ. क. ८१७२

[९४]

कां गा माझा तुज न ये कळवळा।
उदारा दयाळा पांडुरंगा ॥ १ ॥

दर्शनाची आस लागली जीवास।
झालों कासावीस तुजविण ॥ २ ॥

दाटला हा गळा लागे ना तो डोळा।
वाहे घळघळां अश्रु-धारा ॥ ३ ॥

उतावीळ मन सुटूं पाहे भान।
दाखवीं चरण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[९५]

रूप चतुर्भुज सुंदर सांवळें।
आजि म्यां देखिलें श्रीहरीचें ॥ १ ॥

चरण सुकुमार कांसे पीतांबर।
वैजयंती-हार कंठीं साजे ॥ २ ॥

सुहास्य-वदन राजीव-लोचन।
मस्तकीं भूषण मुकुटाचें ॥ ३ ॥

शंख चक्र गदा पद्म करीं शोभे।
सन्मुख हें उभें स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ९६ ]

देवा तूं सागर मी तुझी लहरी।
दोघांसी अंतरीं भेद नाहीं ॥ १ ॥
देवा तूं सुवर्ण मी तुझें भूषण।
दोघां एकपण ठाईचें चि ॥ २ ॥
देवा तूं चंद्रमा मी तुझी चंद्रिका।
आम्हां एकमेकां अभिन्नत्व ॥ ३ ॥
देवा तूं प्रदीप मी तुझा प्रकाश।
नांदूं सावकाश स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ९७ ]

सांडुनी फलाशा स्व-कर्म आदरीं।
गीतेमाजीं हरि उपदेशी ॥ १ ॥
साधितां स्व-कर्म होते चित्त-शुद्धि।
तेणें मोक्ष-सिद्धि लाभतसे ॥ २ ॥
जोंवरी अंतरीं नाहीं आत्म-ज्ञान।
तों वरी साधन कर्म हें चि ॥ ३ ।
स्वामी म्हणे जाण होतां आत्म-ज्ञान।
कर्माचें बंधन राहे चि ना ॥ ४ ॥

[९८]

अखंड एकांत आवडे जीवास ।
लौकिकाचा त्रास वाटतसे ॥ १ ॥
लावोनियां मन देवाचें चिंतन ।
वाटे रात्रं-दिन करावेंसें ॥ २ ॥
देहाचा अभिमान गळावा संपूर्ण ।
भावें व्हावें लीन हरि-पायीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे घ्यावें हरिचें दर्शन ।
नावडे त्याविण दुजें कांहीं ॥ ४ ॥

[९९]

देतसे व्याख्यान सांगे ब्रह्म-ज्ञान ।
पोटीं अभिमान पांडित्याचा ॥ १ ॥
स्वानुभवाविण डोलवुनी मान ।
वंचितो आपण आपणातें ॥ २ ॥
वाउगा तो शीण वृथा शब्द-ज्ञान ।
नाहीं समाधान अंतर्यामीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे नाहीं बाणली विरक्ति ।
तरी आत्म-प्राप्ति कैसी होय ॥ ४ ॥

[ १०० ]

सद्गुरु गणनाथ दयाळ समर्थ ।
भेटतां कृतार्थ झाला जीव ॥ १ ॥
अविद्या-निद्रेंत होता भव-भ्रांत ।
सुख-दुःख भोगीत स्वप्नामाजीं ॥ २ ॥
आत्म-ज्ञानें आली अखंड जागृति ।
गेली भव-भ्रांति हारपोनी ॥ ३ ॥
धन्य तें पावन सद्गुरु-दर्शन ।
वंदिले चरण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १०१ ]

असो याति-हीन असो मति-हीन ।
सर्वांसी तारण हरि-नाम ॥ १ ॥
असो हरिजन कीं असो ब्राह्मण ।
जाय उद्धरून हरि-नामें ॥ २ ॥
असो नारी-नर असो सान-थोर ।
होतसे उद्धार हरि-नामें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे कुळ वर्ण अकारण ।
हरिसी प्रमाण भाव एक ॥ ४ ॥

[ १०२ ]

नारायणीं लय लागतां अक्षय ।
विषयांचें भय काय करी ॥ १ ॥
साधे मनोजय बुद्धीचा निश्चय ।
विषय तो होय मोक्षालागीं ॥ २ ॥
वाउगे ते काय करावे उपाय ।
ध्यावे हरिपाय भक्ति-भावें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे हरि येतसे धांवोन ।
बाधों नेदी विघ्न सेवकातें ॥ ४ ॥

[ १०३ ]

भाविकाची चिंता वाहे भगवंत ।
पाहे हिताहित तो चि त्याचें ॥ १ ॥
आड येतां विघ्न घेतसे धांवणें ।
रक्षायाकारणें भाविकातें ॥ २ ॥
जें जें वांछी मन तें तया देऊन ।
न्यून करी पूर्ण भाविकाचें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे कैसा स्पर्शों शके काळ ।
सांभाळी गोपाळ भाविकातें ॥ ४ ॥

[ १०४ ]

जन्मोनियां काय साधिलें स्व-हित ।
केली यातायात प्रपंचाची ॥ १ ॥

केलें घर-दार मांडिला संसार ।
लोकीं लोकाचार चालविला ॥ २ ॥

सुखासाठीं वृथा केली धडपड ।
यातना उदंड भोगियेल्या ॥ ३ ॥

स्वामी म्हणे तरी सरे चि ना हांव ।
आठवेना देव पामरातें ॥ ४ ॥

[ १०५ ]

जाय जाय वेगें हरिसी शरण ।
भक्ति-भावें लीन होवोनियां ॥ १ ।

तो चि दया-घन होवोनि प्रसन्न ।
कृपामृतें पूर्ण शांतवील ॥ २ ॥

विषयाचें भय पावोनि विलय ।
तेणें ताप-त्रय हारपेल ॥ ३ ॥

स्वामी म्हणे चित्त स्वानंद-निर्भर ।
होईल संसार सुख-मय ॥ ४ ॥

[ १०६ ]

संतांची संगति घडो सर्वकाळ।
आवडो गोपाळ अंतर्यामीं ॥ १ ॥

काम क्रोध लोभ निमोत आघवे।
रमो चित्त भावें हरिपायीं ॥ २ ॥

जळो तो मत्सर गळो मोह मद।
लागो मना छंद गोविंदाचा ॥ ३ ॥

विषयांची गोडी न वाटो जीवास।
लागो हरि-ध्यास स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १०७ ]

देहीं उदासीन असो माझें मन।
राहो सावधान अंतर्यामीं ॥ १ ॥

संसारीं निर्लिप्त असो माझें चित्त।
राहो साक्षीभूत होवोनियां ॥ २ ॥

न हो माझी बुद्धि संमोहें भ्रमिष्ट।
राहो एकनिष्ठ आत्म-रूपीं ॥ ३ ॥

स्वामी म्हणे माझा जावो अहंकार।
होवो साक्षात्कार स्वरूपाचा ॥ ४ ॥

[ १०८ ]

संत ते उदार कृपेचे सागर ।
तयांचे उपकार काय वानूं ॥ १ ॥
इच्छिती कल्याण देती आत्म-धन ।
मज रात्रं-दिन सांभाळिती ॥ २ ॥
स्व-रूपीं जागृत ठेविती संतत ।
ठायीं चि भगवंत भेटविती ॥ ३ ॥
स्वामी म्हणे ऋण न फिटे म्हणोन ।
भावें लोटांगण घालितसें ॥ ४ ॥

[ १०९ ]

नांदतों एकला विश्वीं माझा मीच ।
मज उंच नीच नाहीं कोणी ॥ १ ॥
विश्वीं नाहीं दुजें ह्यास्तव सहजें ।
मत्सर नुपजे चित्तामाजीं ॥ २ ॥
सांडोनियां मज गेले काम-क्रोध ।
होतां निज-बोध अंतर्यामीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मन जाहलें तल्लीन ।
आतां नारायण अंतर्बाह्य ॥ ४ ॥

[ ११० ]

अंतरीं सन्निध राहे श्रीगोविंद ।
परि मति-मंद पाहे चि ना ॥ १ ॥
नाभींत कस्तुरी असतां जवळी ।
हिंडे रानोमाळीं मृग जैसा ॥ २ ॥
विषयांचा छंद घेउनियां वायां ।
आनंद सेवाया धांवतसे ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मोहें झालासे आंधळा ।
स्वानंद-सोहळा भोगी चि ना ॥ ४ ॥

[ १११ ]

झाला तरी होवो लौकिक सन्मान ।
पोटीं अभिमान धरूं नये ॥ १ ॥
आहे तरी असो दारा पुत्र धन ।
संसारीं गुंतून जाऊं नये ॥ २ ॥
भुकेल्यासी अन्न सत्पात्रीं तें दान ।
भावें दिल्याविण राहूं नये ॥ ३ ॥
स्वामी म्हणे जावो गेला तरी प्राण ।
ईश्वराचें ध्यान सोडूं नये ॥ ४ ॥

[ ११२ ]

भावें राम कृष्ण बोलूं ।
प्रेमें कीर्तनांत डोलूं ॥ १ ॥

मन करोनी तल्लीन ।
ध्याऊं हरिचे चरण ॥ २ ॥

करूं नामाचा गजर ।
सुखें होऊं भव-पार ॥ ३ ॥

स्वामी म्हणे रात्रं-दिन ।
घेऊं देवाचें दर्शन ॥ ४ ॥

[ ११३ ]

खेळविसी तैसा खेळेन साचार ।
तूं चि सूत्र-धार बाहुलें मी ॥ १ ॥

देवा तूं चि धनी मी तुझा चाकर ।
तुझा चि आधार मजलागीं ॥ २ ॥

बोलविसी तैसें बोलेन वचन ।
मज अभिमान कासयाचा ॥ ३ ॥

काया वाचा मन तुझ्या चि आधीन ।
तुझ्या पायीं लीन स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ११४ ]

जनलोक मज हांसो उपहासें ।
लागलेंसे पिसें गोपाळाचें ॥ १ ॥

लौकिकाची लाज वाटे ना मनातें ।
जोडिलें मी नातें गोपाळाशीं ॥ २ ॥

जनीं वनीं मनीं आप्त इष्ट कोणी ।
गोपाळा वांचोनी नाहीं मज ॥ ३ ॥

आतां सर्वकाळ गोपाळाची भेटी ।
बोलूं गुजगोष्टी स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ११५ ]

कां गा मना होसी दुःखी कष्टी खिन्न ।
तुज काय न्यून सांगें मज ॥ १ ॥

दुःखाचें कारण पाहें विचारून ।
बुद्धीसी शरण जावोनियां ॥ २ ॥

विषयांचा संग देई सुख-दुःख ।
अनित्य ते देख होती जाती ॥ ३ ॥

स्वामी म्हणे व्हावें नित्य समाधान ।
तरी करीं ध्यान स्व-रूपाचें ॥ ४ ॥

[ ११६ ]

नको निराहार नको सेवूं फार ।
सदा मिताहार असों द्यावा ॥ १ ॥
नको अति झोंप नको जागरण ।
असावें प्रमाण निद्रेमाजीं ॥ २ ॥
नको बोलूं फार नको धरूं मौन ।
करावें भाषण परिमित ॥ ३ ॥
संयमी जीवन बाणतां सहज ।
स्वामी म्हणे तुज योग-सिद्धि ॥ ४ ॥

[ ११७ ]

घेई ना जें भावें हरिचें दर्शन ।
काय तें नयन असोनियां ॥ १ ॥
हरि-नामोच्चार गर्जे ना जी वाणी ।
असोनी नसोनी सारखी चि ॥ २ ॥
होय ना श्रवण हरि-गुण-गान ।
काय तरी कान असोनियां ॥ ३ ॥
हरिपायीं मन होय ना तल्लीन ।
जळो तें जीवन स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ११८ ]

आतां काय मज काळाचें तें भय ।
श्रीगुरुचे पाय देखियेले ॥ १ ॥
राहे कोठें कैसा देहाचा संबंध ।
होतां आत्म-बोध अंतर्यामीं ॥ २ ॥
देहाचे व्यापार चालतां अलिप्त ।
राहें साक्षीभूत सर्वकाळ ॥ ३ ॥
राहो किंवा जावो देह नाशिवंत ।
मी तों देहातीत स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ ११९ ]

सर्व सुखें आलीं धांवत सामोरीं ।
अंतरीं श्रीहरि प्रकटतां ॥ १ ॥
राजे महा-राजे रंक ते बापुडे ।
होती आम्हांपुढें सत्ताहीन ॥ २ ॥
शास्त्रवेत्ते भले पंडित आगळे ।
मीपणें बुडाले सुख-दुःखीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे आम्ही सुख-दुःखातीत ।
अंतरीं उदित नित्य-सुख ॥ ४ ॥

[ १२० ]

ध्येयासाठीं जगूं सोसूं सुख-दुःखें ।
ध्येयासाठीं सुखें वेंचूं प्राण ॥ १ ॥

सत्यासाठीं मारूं स्वार्थावरी लाथ ।
लौकिकाची मात दूर ठेवूं ॥ २ ॥

हरिसाठीं करूं सर्वस्वाचें दान ।
झुगारूं बंधन अहंतेचें ॥ ३ ॥

स्वामी म्हणे मन ध्येयीं समर्पून ।
होऊं चि आपण ध्येयरूप ॥ ४ ॥

[ १२१ ]

धर्म अर्थ काम ।
आम्हां एक आत्माराम ॥ १ ॥

आत्मारामीं मन ।
रंगलेंसे रात्र-दिन ॥ २ ॥

भक्ति-सुखापुढें ।
मोक्ष-सुख तें नावडे ॥ ३ ॥

भक्ति लाभतां अद्वय ।
स्वामी झाला सुखमय ॥ ४ ॥

[ १२२ ]

कृपावंत थोर सद्गुरु उदार ।
तेणें योग-सार दिलें मज ॥ १ ॥
मन-पवनाची दाखवोनी वाट ।
गगनाशीं गांठ बांधियेली ॥ २ ॥
शून्य-निःशून्याचें बीज महा-शून्य ।
भेटविलें धन्य हरि-रूप ॥ ३ ॥
स्वामी म्हणे माझा नाथ-संप्रदाय ।
अवघें हरिमय योग-बळें ॥ ४ ॥

[ १२३ ]

चढो पालखींत पडो वा आगींत ।
देह नाशिवंत मातीमोल ॥ १ ॥
काया कदा काळीं जाणार जाईल ।
सांभाळावें शील जीवें-भावें ॥ २ ॥
देहाची आसक्ति असों नये चित्तीं ।
वसों द्यावी प्रीति हरिपायीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे ऐसी करावी प्रार्थना ।
देवा नारायणा धांव पाव ॥ ४ ॥

[ १२४ ]

स्वरूप-महिमा वर्णवे ना वाचे ।
पुरे ना शब्दाचें बळ तेथें ॥ १ ॥
विचाराचा डोळा होतसे आंधळा ।
तर्क तो पांगळा ठरे जेथें ॥ २ ॥
मना-इंद्रियांचा काय तेथें पाड ।
शास्त्रांसी निवाड होये चि ना ॥ ३ ॥
'नेति' वेद बोले तें चि म्यां देखिलें ।
गुरु-कृपा-बळें स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १२५ ]

शास्त्रें विद्या कला काय तीं शिकोन ।
इच्छी ना कल्याण जगताचें ॥ १ ॥
यत्नें संपादिलें व्यवहार-चातुर्य ।
कराया सत्कार्य योजी ना तें ॥ २ ॥
जळो तें चातुर्य जळो त्याची कला ।
जी दीनां दुर्बळां संरक्षी ना ॥ ३ ॥
जळो ती संपत्ति जळो त्याचा मान ।
जळो त्याचें ज्ञान स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १२६ ]

नाहीं पोटीं भूत दया ।
काय शास्त्रें घोकोनियां ॥ १ ॥
नाहीं अंगीं नम्र-पण ।
काय विद्या धन मान ॥ २ ॥
नाहीं नीति ना आचार ।
काय कलेचा बडिवार ॥ ३ ॥
नाहीं परोपकार-वृत्ति ।
काय करावी संपत्ति ॥ ४ ॥
नाहीं क्षमेचा आधार ।
काय सत्ता-अधिकार ॥ ५ ॥
नाहीं दुर्बळ-सांभाळ ।
काय करावें तें बळ ॥ ६ ॥
नाहीं आत्म-समाधान ।
काय करावें तें ज्ञान ॥ ७ ॥
जरी आठवेना देव ।
काय संसार-गौरव ॥ ८ ॥
स्वामी म्हणे भक्तिविणें ।
वृथा मानवाचें जिणें ॥ ९ ॥

[ १२७ ]

जन्मोनियां नाहीं साधिलें स्व-हित ।
तयाचें जीवित मातीमोल ॥ १ ॥

कासया जन्मला आला तैसा गेला ।
वायां कष्टविला निज-देह ॥ २ ॥

सुखासाठीं केला संसाराचा धंदा ।
भोगिली आपदा नानापरी ॥ ३ ॥

स्वामी म्हणे त्यासी कैचें समाधान ।
अंतीं नागवण सर्वस्वाची ॥ ४ ॥

[ १२८ ]

भाव अंतरीं यथार्थ ।
देव देणार समर्थ ॥ १ ॥

करूं धंदा व्यवहार ।
स्मरूं सदा सर्वाधार ॥ २ ॥

कर्ता करविता तो चि ।
ऐसी प्रचीति आम्रुची ॥ ३ ॥

स्वामी म्हणे साक्षीभूत ।
सुखें राहूं संसारांत ॥ ४ ॥

[ १२९ ]

काय सांगूं संत-कृपेचा नवलाव ।
प्रकटला देव अंतर्यामीं ॥ १ ॥
सोऽहं सोऽहं ऐसा नित्य निदिध्यास ।
लागला जीवास आपेंआप ॥ २ ॥
लिहितां वाचितां बोलतां बैसतां ।
देतां घेतां खातां हिंडतां हि ॥ ३ ॥
तिन्ही अवस्थांचा झालों साक्षीभूत ।
राहिलों निवांत स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १३० ]

भाग्य हें उदेलें धन्य झाले डोळे ।
देखिलें सांवळें हरि-रूप ॥ १ ॥
सौंगडी सकळ मेळवुनी मेळ ।
खेळे नंद-बाळ गोकुळांत ॥ २ ॥
तो चि कुंज-वनीं चारितसे धेनू ।
वाजवुनी वेणु वेध लावी ॥ ३ ॥
दहीं दूध लोणी भक्षितो चोरुनी ।
तो चि ध्यानीं मनीं स्वामी म्हणे ।

[ १३१ ]

आम्हां रात्र-दिन हरिचें चिंतन ।
हरि-पायीं मन स्थिरावलें ॥ १ ॥

आतां अंतर्बाह्य हरिचें दर्शन ।
झालें त्रि-भुवन हरि-रूप ॥ २ ॥

देखतां चरण गेलें मी-तूं-पण ।
संसाराचें भान हारपलें ॥ ३ ॥

ध्येय-ध्याता-ध्यान होउनी आपण ।
खेळे नारायण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १३२ ]

भक्त तो प्रेमळ अर्पितो केवळ ।
पान फूल फळ भक्ति-भावें ॥ १ ॥

भक्ताची ती भेट आवडे अनंता ।
भुलोनी देखतां मुखीं घाली ॥ २ ॥

षोडशोपचार पूजेचा संभार ।
भार तो साचार भावाविण ॥ ३ ॥

येर फूल पान भक्तीची ती खूण ।
भाव चि प्रमाण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १३३ ]

नमो जय जय सद्‌गुरुराव ।
देहीं दाखविला देव ॥ १ ॥

पाजळुनी ज्ञान-ज्योती ।
दूर केली भव-भ्रांति ॥ २ ॥

होवोनियां गुणातीत ।
जगीं वर्तें साक्षीभूत ॥ ३ ॥

स्वामी म्हणे निःसंदेह ।
झालों देहीं चि विदेह ॥ ४ ॥

[ १३४ ]

मनासी प्रसन्न ठेवीं रात्रं-दिन ।
कदा काळीं खिन्न होवों नेदीं ॥ १ ॥

तें चि घाली जाण जीवासी बंधन ।
मोक्षासी कारण तें चि होय ॥ २ ॥

युक्ति-प्रयुक्तीनें तया गोंजारून ।
दाखवावी खूण स्व-रूपाची ॥ ३ ॥

स्वामी म्हणे मन सारोनियां मागें ।
व्हावें गा निजांगें शांति-रूप ॥ ४ ॥

[ १३५ ]

बोलेन तें होवो तुझें चि स्तवन।
चिंतीन तें ध्यान होवो तुझें ॥ १ ॥
देखेन तें होवो तुझें चि दर्शन।
त्वद्गुण-श्रवण ऐकेन तें ॥ २ ॥
हिंडेन ती होवो तुज प्रदक्षिणा।
करीन भोजना नैवेद्य तो ॥ ३ ॥
घडे जो व्यापार ती चि तुझी पूजा।
होवो केशवराजा स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १३६ ]

निरोगी निर्मळ असावें शरीर।
जाण तें मंदिर देवाजीचें ॥ १ ॥
मन बुद्धि शुद्ध असों देई नित्य।
तें पूजा-साहित्य देवाजीचें ॥ २ ॥
सर्वकाळ चित्त ठेवावें पवित्र।
तें चि पूजा-पात्र देवाजीचें ॥ ३ ॥
सोऽहं-भावें जीव पूजी नारायणा।
सांडुनी मीपणा स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १३७ ]

एक चि हरि-रूप सर्वत्र संचलें ।
व्यापुनी राहिलें त्रैलोक्यासी ॥ १ ॥
एक हरिविण दुजें नाहीं कांहीं ।
जीव-जगत् पाहीं मायाजन्य ॥ २ ॥
मिथ्या माया जाण मिथ्या नाम-रूपें ।
एकला स्वरूपें हरि नांदे ॥ ३ ॥
व्याप्य ना व्यापक वाच्य ना वाचक ।
एक तें निःशंक स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १३८ ]

सद्वस्तु अव्यक्त अनादि अनंत ।
अचळ अच्युत अद्वितीय ॥ १ ॥
निष्क्रिय निर्लिप्त अज अविकार ।
अक्षय्य अपार निरालंब ॥ २ ॥
अरूप अरंग अवीट अभंग ।
निर्गुण निःसंग निर्विशेष ॥ ३ ॥
स्वामी म्हणे कैसें करावें वर्णन ।
स्वीकारावें मौन हें चि भलें ॥ ४ ॥

[ १३९ ]

वस्तु सनातन शाश्वत पुराण ।
सकळ संपूर्ण सर्वाधार ॥ १ ॥

नित्य शुद्ध बुद्ध असे स्वयंसिद्ध ।
नांदते स्वच्छंद सर्वां ठायीं ॥ २ ॥

स्थिर एकरूप सत्य सर्वात्मक ।
व्याप्य ती व्यापक आत्मपणें ॥ ३ ॥

स्वामी म्हणे काय सांगों महिमान ।
जाणती ते खूण अंतर्निष्ठ ॥ ४ ॥

[ १४० ]

नाथिला अभिमान देहीं बाळगून ।
कां जासी गुंतून सुख-दुःखीं ॥ १ ॥

सुख-दुःखातीत राहें तूं अलिप्त ।
देहीं साक्षीभूत होवोनियां ॥ २ ॥

काय दिन-रात्र जाणतो आदित्य ।
प्रकाशे तो नित्य जियापरी ॥ ३ ॥

स्वामी म्हणे तैसें वर्ततां संसारीं ।
एक तूं निर्धारीं आत्म-सुख ॥ ४ ॥

[ १४१ ]

थाहें कोण कोणा तारी ।
कोण कोणातें संहारी ॥ १ ॥

हरिविण चराचरीं ।
वस्तु आहे का दुसरी ॥ २ ॥

कोण सुष्ट कोण दुष्ट ।
पुण्यवंत वा पापिष्ट ॥ ३ ॥

स्वामी म्हणे हरि-रूप ।
विश्व झालें आपेंआप ॥ ४ ॥

[ १४२ ]

मला देवा तुझ्या रूपासी भाळलों ।
वृथा होतों मेलों संसारांत ॥ १ ॥

तुझे पाय मज एक चि विषय ।
आतां काय भय प्रपंचाचें ॥ २ ॥

विश्व चराचर तुझा चि अवतार ।
ऐसा साक्षात्कार झाला जीवा ॥ ३ ॥

स्वामी म्हणे होय तुझी नित्य भेटी ।
पडे पायीं मिठी अखंडित ॥ ४ ॥

[ १४३ ]

संतांचा सहवास आवडे जीवास ।
दुणावे उल्हास अंतर्यामीं ॥ १ ॥
होतां संतभेटी तयांचे संगतीं ।
कराव्या एकांतीं गुज-गोष्टी ॥ २ ॥
भक्ति-सुधा-रस सेवुनी यथेष्ट ।
असावें संतुष्ट आत्म-रंगीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मज ही चि एक आस ।
संतांचा सहवास नित्य घडो ॥ ४ ॥

[ १४४ ]

नेणें मी वेदान्त न जाणें सिद्धान्त ।
जाणे भगवंत सर्व कांहीं ॥ १ ॥
नेणें वज्रासन नेणें प्राणायाम ।
जाणे आत्माराम सर्व कांहीं ॥ २ ॥
न जाणें भजन न जाणें पूजन ।
जाणे जनार्दन सर्व कांहीं ॥ ३ ॥
नेणें धर्माधर्म नेणें कर्माकर्म ।
जाणे पुरुषोत्तम सर्व कांहीं ॥ ४ ॥
स्वामी म्हणे तुज येतसें शरण ।
जाण मी अजाण वासुदेवा ॥ ५ ॥

[ १४५ ]

देह पराधीन नाशिवंत जाण ।
वायां अभिमान वाहसी कां ॥ १ ॥
गुंतुनी संसारीं मानिसी मी-माझें ।
वाळगिसी ओझें भ्रांतीचें चि ॥ २ ॥
होई सावधान विचारीं कल्याण ।
जेणें समाधान पावसील ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मोह झुगारुनी दूर ।
सदा राहें स्थिर आत्म-रूपीं ॥ ४ ॥

[ १४६ ]

आतां मज एक विठ्ठलाचा छंद ।
लौकिक-संबंध दूर ठेला ॥ १ ॥
विठ्ठलावांचून न बोलें वचन ।
न देखे नयन दुजें कांहीं ॥ २ ॥
मज रात्र-दिन विठ्ठलाचें ध्यान ।
वाटे जीव प्राण विठ्ठल चि ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मज विठ्ठल प्रमाण ।
वाहतसें आण विठ्ठलाची ॥ ४ ॥

[ १४७ ]

निवडावें जैसें हंसें क्षीर-नीर ।
तैसें सारासार विचारावें ॥ १ ॥
नामरूपात्मक जग हें मायिक ।
अविनाश एक आत्म-पद ॥ २ ॥
आत्म-पदीं द्यावी बुडी निश्चयाची ।
आसक्ति देहाची सांडोनियां ॥ ३ ॥
असोनि संसारीं घ्यावें आत्म-सुख ।
तरी चि सार्थक स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १४८ ]

सगुण निर्गुण कासया हा भेद ।
एकला अभेद वासुदेव ॥ १ ॥
वासुदेवाविण विश्वीं नाहीं दुजें ।
नांदतो सहजें एकला चि ॥ २ ॥
अणुअणूंतून राहिला भरून ।
सकळ संपूर्ण वासुदेव ॥ ३ ॥
आत्मा बुद्धि मन इंद्रियें विषय ।
वासुदेवमय स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १४९ ]

करीं गा निष्काम स्वकर्माचरण ।
नामसंकीर्तन विठ्ठलाचें ॥ १ ॥

आत्म-निरीक्षण किंवा धरीं ध्यान ।
स्वीकारीं साधन आवडे तें ॥ २ ॥

साधनीं निमग्न राहें रात्रं-दिन ।
तेणें होय जाण चित्त-शुद्धि ॥ ३ ॥

होतां चित्त-शुद्धि लाभे आत्म-ज्ञान ।
ज्ञानें समाधान स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १५० ]

अंतरीं संतत करीं सोऽहं-ध्यान ।
न जाईं गुंतून संसारांत ॥ १ ॥

धन सुत दारा असूं दे पसारा ।
नको देऊं थारा आसक्तीतें ॥ २ ॥

होवो हानि-लाभ पावो सुख-दुःख ।
न सोडीं विवेक साक्षित्वाचा ॥ ३ ॥

स्वामी म्हणे राहें देहीं उदासीन ।
पाहें रात्रं-दिन आत्म-रूप ॥ ४ ॥

[ १५१ ]

एक वासुदेव नांदे चराचरीं ।
त्याविण दुसरी वस्तु नाहीं ॥ १ ॥
वासुदेव येथें वासुदेव तेथें ।
व्यापितो सर्वांतें वासुदेव ॥ २ ॥
व्याप्य तो व्यापक सर्व सर्वात्मक ।
सर्वातीत एक वासुदेव ॥ ३ ॥
ध्याता ध्यान ध्येय वासुदेवमय ।
एक तो अद्वय स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १५२ ]

अंतरीं विरक्ति नाहीं भाव-भक्ति ।
तयां अधोगति चुके चि ना ॥ १ ॥
लोळती शेणांत सुखें शेणकिडे ।
तैसे ते बापुडे प्रपंचांत ॥ २ ॥
गुंतुनियां देहीं बुडाले संदेहीं ।
अंतीं तयां नाहीं समाधान ॥ ३ ॥
भाव-भक्तिहीन कोरडें कठीण ।
जळो तें जीवन स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १५३ ]

सखा माझा नारायण ।
करी चिंता निवारण ॥ १ ॥
मज सांवरितां हरि ।
आलीं विघ्नें दूर करी ॥ २ ॥
दोष जाळुनी समस्त ।
शुद्ध करी माझें चित्त ॥ ३ ॥
तो चि लक्षी माझें हित ।
स्वामी म्हणे मी निश्चिंत ॥ ४ ॥

[ १५४ ]

भासे मृगजळ तैसें चि केवळ ।
विश्व हें सकळ भ्रांतिरूप ॥ १ ॥
रज्जूवरी व्हावा सर्पाचा आभास ।
तैसा विश्वाभास आत्मरूपीं ॥ २ ॥
वांझेची संतति तैसी भूतसृष्टि ।
व्हावी जैसी वृष्टि खपुष्पांची ॥ ३ ॥
स्वामी म्हणे विश्व नश्वर मायिक ।
अविनाशी एक आत्म-तत्त्व ॥ ४ ॥

[ १५५ ]

मना तुजप्रति एक चि विनंति ।
आळवीं श्रीपति आवडीनें ॥ १ ॥

हरि-पदांबुजीं होउनी भ्रमर ।
करीं निरंतर गुंजारव ॥ २ ॥

श्रीहरि चंद्रमा होई तूं चकोर ।
सेवीं गा मधुर सुधा-रस ॥ ३ ॥

श्रीहरि माउली बाळ तूं होऊन ।
करीं स्तन-पान स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १५६ ]

तुजलागीं मना ऐसी विज्ञापना ।
भावें जनार्दना आठवावें ॥ १ ॥

विषयांची भीड येवों नेदीं आड ।
करीं गा अखंड हरि-ध्यान ॥ २ ॥

तोडीं देह-बंध लौकिक-संबंध ।
जोडीं सौख्य-कंद वासुदेव ॥ ३ ॥

स्वामी म्हणे नाहीं काळाचें हि भय ।
होतां चि तन्मय वासुदेवीं ॥ ४ ॥

[ १५७ ] *

एकशें छपन्न अभंग रचोन ।
पहाया म्हणोन दिले संतां ॥ १ ॥
संतीं संतोषून डोलविली मान ।
परी एक न्यून दाखविलें ॥ २ ॥
" अनिर्दिष्टनाम काव्य गमे उणें ।
केली मिठाविणें पाक-सिद्धि ॥ ३ ॥
अभंगाशेवटीं नामाचा निर्देश ।
करणें सुयश जोडावया ॥ ४ ॥ "
संतांहातीं ऐसा पाठवी निरोप ।
माझा माय-बाप वासुदेव ॥ ५ ॥
संतांचें वचन मानुनी प्रमाण ।
न्यून केलें पूर्ण हरि-कृपें ॥ ६ ॥
लक्षुनी भावार्थ अभंग समस्त ।
पुनरपि साद्यन्त संशोधिले ॥ ७ ॥
अभंगाशेवटीं नामाची योजना ।
केली जनार्दना तोषवाया ॥ ८ ॥
स्वामी म्हणे माझा सखा नारायण ।
कोठें कांहीं न्यून पडों नेदी ॥ ९ ॥

* परिशिष्ट पहा.

[ १५८ ]

तीन पाउलांत व्यापिला त्रि-लोक।
काय तें कौतुक वामनाचें ॥ १ ॥
झाला द्वार-पाळ बळीचा पाताळीं।
भक्तातें सांभाळी सर्वकाळ ॥ २ ॥
वामनाचे पायीं ठेवोनियां डोई।
भक्ति-भावें होई लीन आतां ॥ ३ ॥
सर्वस्वाचें दान देतां वामनातें।
उरे ना मनातें चिंता कांहीं ॥ ४ ॥
स्वामी म्हणे दान मागतो वामन।
तयासी मीपण समर्पिलें ॥ ५ ॥

[ १५९ ]

वासुदेवाविण न देखें दर्शन।
वासुदेवीं मन स्थिरावलें ॥ १ ॥
आतां अंतर्बाह्य वसे वासुदेव।
नसे रिता ठाव अणुमात्र ॥ २ ॥
काय विश्व कोठें गेलें मीतूंपण।
हारपलें भान एकाएकीं ॥ ३ ॥
देवभक्तपण करोनी निर्माण।
आपुला आपण खेळतसे ॥ ४ ॥
स्वामी म्हणे झालों वासुदेवीं लीन।
भावें लोटांगण घालोनियां ॥ ५ ॥

[ १६० ]

वासुदेवमय विश्व हें आघवें ।
भ्रांतीचे नि नांवें शून्याकार ॥ १ ॥

नामरूपातीत वसे वासुदेव ।
विश्वीं स्वयमेव एकला चि ॥ २ ॥

प्रभा आणि भानु एक चि संपूर्ण ।
पट तंतूहून भिन्न काई ॥ ३ ॥

सगुण निर्गुण तैसा नारायण ।
भूतांसी अभिन्न स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १६१ ]

एक चि तत्त्वतां आत्म-रूप-सत्ता ।
भूतांसी भिन्नता उरे कोठें ॥ १ ॥

काय काळोखातें ओळखितो सूर्य ।
तेजें लोक-त्रय प्रकाशी जो ॥ २ ॥

अमृत तें जाणे काइ मृत्यु-वार्ता ।
चंद्रा दाहकता असे ठावी ? ॥ ३ ॥

स्वामी म्हणे होतां स्वरूपीं तद्रूप ।
लोपे आपेंआप द्वैताभास ॥ ४ ॥

[ १६२ ]

आठ हि प्रहर संसार व्यवहार ।
करी ना विचार दुजा कांहीं ॥ १ ॥
नाठवितां देव नाचरितां धर्म ।
अर्थ आणि काम भोगूं पाहे ॥ २ ॥
अर्थ अनर्थासी होउनी कारण ।
कामें केला दीन बापुडा तो ॥ ३ ॥
स्वामी म्हणे अंतीं साधिला ना स्वार्थ ।
जिणें गेलें व्यर्थ पामराचें ॥ ४ ॥

[ १६३ ]

रामकृष्ण परमहंस ।
थोर जगदंबेचा दास ॥ १ ॥
कालीमातेचें चिंतन ।
करी भावें रात्रं-दिन ॥ २ ॥
जगन्माते संगें बोले ।
माता सांगे तैसा चाले ॥ ३ ॥
कालीमातेचा प्रख्यात ।
भक्त योगी ज्ञानवंत ॥ ४ ॥
स्वामी म्हणे होतां भेटी ।
नेत्रीं प्रेमाश्रु दाटती ॥ ५ ॥

[ १६४ ]

साधकें सर्वदा असावें सावध।
यत्नें काम-क्रोध आवरावे ॥ १ ॥
अंतरीं जागृत ठेवावा विवेक।
लक्षूनियां एक आत्म-रूप ॥ २ ॥
विश्वासें करावा हरिनामोच्चार।
होतां अनावर काम-क्रोध ॥ ३ ॥
स्वामी म्हणे हा चि निर्वाणींचा बाण।
तेणें निर्दालन षड्रिपूंचें ॥ ४ ॥

[ १६५ ]

घडे जें स्वभावें कर्म तें आघवें।
भावें समर्पावें हरिपायीं ॥ १ ॥
देता घेता कर्ता भोक्ता नारायण।
भाव परिपूर्ण असों द्यावा ॥ २ ॥
तेणें शुभाशुभ-कर्माचें बंधन।
न लागतां जाण मोक्ष-लाभ ॥ ३ ॥
स्वामी म्हणे भक्तीपासीं चारी मुक्ती।
ऐसी चि प्रचीति आली मज ॥ ४ ॥

[ १६६ ]

जनासी घरदार कुटुंब-संसार।
आम्ही दिगंबर ठायींचे चि ॥ १ ॥
जनासी अधिकार-वैभवाची हांव।
आम्हां रूप नांव तें हि नको ॥ २ ॥
जन अपेक्षिती धन मान कीर्ति।
आम्हांलागीं क्षिती नाहीं त्याची ॥ ३ ॥
स्वामी म्हणे आम्ही झालों कानफाटे।
चालों उफराटे जगामाजीं ॥ ४ ॥

[ १६७ ]

नाथ-संप्रदायी आम्ही कानफाटे।
जाऊं नका वाटे आम्मुचिया ॥ १ ॥
मन-पवनाची घालोनियां गांठ।
करूं वाताहात संसाराची ॥ २ ॥
देहासवें पुसूं लौकिकाचें नांव।
नेदूं उरों ठाव जीवासी हि ॥ ३ ॥
स्वामी म्हणे तुम्हां बुडवूं महा-शून्यीं।
गगनासी आटणी होय जेथें ॥ ४ ॥

[ १६८ ]

हरि-रूप ध्याऊं हरि-रूप पाहूं ।
अखंडित राहूं हरिपायीं ॥ १ ॥
सेवूं नामामृत होऊं या पुनीत ।
गावूं हरि-गीत आवडीनें ॥ २ ॥
तन-मन-धन हरिसी अर्पून ।
घालूं लोटांगण भक्ति-भावें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे लावूं सार्थकीं जीवन ।
हरिसी शरण जावोनियां ॥ ४ ॥

[ १६९ ]

सांगें कां गा जासी स्तुतीसी भाळून ।
जगीं तुझ्याविण दुजें कोण ॥ १ ॥
ऐकोनियां निंदा कां गा होसी खिन्न ।
जगीं तुझ्याविण दुजें कोण ॥ २ ॥
तूं चि तुझा बंधु तूं चि तुझा वैरी ।
तुझा तूं विचारीं दुजें कोण ॥ ३ ॥
कोणाशीं गा द्वेष कोणावरी लोभ ।
एकला स्वयंभ तुझा तूं चि ॥ ४ ॥
स्वामी म्हणे पाहें आपणा आपण ।
विश्वीं दुजेपण राहे कैचें ॥ ५ ॥

[ १७० ]

एक झाला सत्ताधारी ।
एक घालितो चाकरी ॥ १ ॥
कुणाचें हि न चले बळ ।
कर्म तैसें भोगी फळ ॥ २ ॥
एक राजा एक रंक ।
एक ज्ञाता एक मूर्ख ॥ ३ ॥
कुणाचें हि न चले बळ ।
कर्म तैसें भोगी फळ ॥ ४ ॥
एक श्रेष्ठ एक हीन ।
एक सुदृढ एक क्षीण ॥ ५ ॥
कुणाचें हि न चले बळ ।
कर्म तैसें भोगी फळ ॥ ६ ॥
एक तृप्त एक भुकी ।
एक सुखी एक दुःखी ॥ ७ ॥
कुणाचें हि न चले बळ ।
कर्म तैसें भोगी फळ ॥ ८ ॥
कृपा करी एकावरी ।
देव एकातें अव्हेरी ॥ ९ ॥
स्वामी म्हणे न चले बळ ।
कर्म तैसें भोगी फळ ॥ १० ॥

[ १७१ ]

अंतरीं भजन चाले रात्रं-दिन ।
तेणें समाधान अनिर्वाच्य ॥ १ ॥
नित्य नाम-जप होतो आपेंआप ।
तया सुखा माप कोण करी ॥ २ ॥
शब्दाविण ध्वनि करोनि श्रवण ।
ठेवीं अनुसंधान आत्म-रूपीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे खूण घ्यावी ओळखून ।
संतांसीं शरण जावोनियां ॥ ४ ॥

[ १७२ ]

पाहे ज्याची दृष्टी सर्वत्र श्रीहरि ।
भक्त तो संसारीं भाग्यवंत ॥ १ ॥
रामकृष्ण हरि उच्चारी वैखरी ।
भक्त तो संसारीं भाग्यवंत ॥ २ ॥
आठवी श्रीहरी नित्य हृदंतरीं ।
भक्त तो संसारीं भाग्यवंत ॥ ३ ॥
स्वामी म्हणे भक्तीपासीं चारी मुक्ति ।
भाग्या नाहीं मिती भक्ताचिया ॥ ४ ॥

[ १७३ ]

होतां अंतर्यामीं ज्ञानाची जागृति ।
जीव-जगत्-भ्रांति दूर ठेली ॥ १ ॥

कर्मजात आतां प्रकृतिच्या माथां ।
लावुनी तत्त्वतां मुक्त झालों ॥ २ ॥

जन्म-मरणाची लोपली ते वार्ता ।
सुखें आलें हाता ब्रह्म-पद ॥ ३ ॥

स्वामी म्हणे चारी देहांतें निरसून ।
झालों आम्ही पूर्ण ब्रह्म-रूप ॥ ४ ॥

[ १७४ ]

सांगा कां गा जावें संतांसी शरण ।
काय संतांविण ज्ञान नाहीं ॥ १ ॥

कशासाठीं व्हावी संतांची मध्यस्थी ।
आम्ही ब्राह्मी-स्थिति स्वयें गाठूं ॥ २ ॥

नका बोलूं ऐसें पावाल पतन ।
तुम्हां अभिमान नागवील ॥ ३ ॥

स्वामी म्हणे संत ब्रह्म मूर्तिमंत ।
विश्व-कल्याणार्थ वावरती ॥ ४ ॥

[ १७५ ]

गुरु तो चि देव ऐसा ठेवीं भाव ।
सद्गुरु-गौरव काय वानूं ॥ १ ॥
तो चि ज्ञान-मूर्ति ब्रह्मानंद-स्थिति ।
देई परा शांति भाविकातें ॥ २ ॥
भक्ति-भावें जातां तयासी शरण ।
होते ओळखण स्व-रूपाची ॥ ३ ॥
स्वामी म्हणे वंदीं सद्गुरु-पाउलें ।
भलें आकारलें पर-ब्रह्म ॥ ४ ॥

[ १७६ ]

सोऽहं सोऽहं ध्यास लागतां जीवास ।
होतसे निरास संमोहाचा ॥ १ ॥
त्रिगुणाचें भान हारपे मीपण ।
होतां सोऽहं-ध्यान निरंतर ॥ २ ॥
अंतीं एकमय ध्याता ध्यान ध्येय ।
होतां ज्ञानोदय अंतर्यामीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मग स्वानंदाचा भोग ।
होय तो हि साङ्ग सुख-रूप ॥ ४ ॥

[ १७७ ]

सांगें प्राण्या कां गा होसी वेडा पिसा ।
श्रीहरि कोंवसा भाविकांसी ॥ १ ॥
हरिकृपेविण संसाराची व्यथा ।
न फिटे सर्वथा ऐसें जाण ॥ २ ॥
जाय मनोभावें हरिसी शरण ।
तेणें उद्धरण होय तुझें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे हा चि निर्धारितां पंथ ।
संसारीं परमार्थ जोडिसील ॥ ४ ॥

[ १७८ ]

संतांसी सद्भावें करोनी प्रणिपात ।
कांहीं आत्म-हित विचारावें ॥ १ ॥
काय ती विरक्ति कैसी आत्म-स्थिति ।
ज्ञानाची प्रचीति कैसी होय ॥ २ ॥
कैसी हरि-भक्ति कैसी शरणागति ।
नामाची महती कैसी काय ॥ ३ ॥
स्वामी म्हणे संत दावितील खूण ।
घ्यावी ओळखून ज्याची त्यानें ॥ ४ ॥

[ १७९ ]

सद्गुरु-चरण उपासितां जाण ।
आंगवलें ज्ञान विज्ञानेंसी ॥ १ ॥

आतां कोठें कांहीं राहिलें ना न्यून ।
अवघें परिपूर्ण एकलें चि ॥ २ ॥

एक ना जें दुजें शून्य ना संपूर्ण ।
देखियेली खूण महा-शून्यीं ॥ ३ ॥

स्वामी म्हणे आम्ही न पडों संदेहीं ।
देहीं चि विदेही आत्मरूप ॥ ४ ॥

[ १८० ]

अनाथांचा नाथ पतित-पावन ।
सज्जन-जीवन वासुदेव ॥ १ ॥

दुर्बलांचा वाली सखा दीन-बंधु ।
कारुण्याचा सिंधु वासुदेव ॥ २ ॥

शरणागता हात देई सदोदित ।
संतांचें दैवत वासुदेव ॥ ३ ॥

स्वामी म्हणे देव भाविकां माउली ।
कृपेची साउली करीतसे ॥ ४ ॥

[ १८१ ]

होतां कृष्णार्पण सर्व हि व्यापार ।
देहीं अहंकार राहे कैंचा ॥ १ ॥

कर्ता करविता एकला श्रीहरि ।
भाव हा अंतरीं दृढावला ॥ २ ॥

होवो निंदा-स्तुति न धरूं ती चित्तीं ।
आळवूं श्री-पति भक्ति-भावें ॥ ३ ॥

स्वामी म्हणे जातां भक्तिचिया वाटे ।
बोंचती ना कांटे विकल्पाचे ॥ ४ ॥

[ १८२ ]

नको नको मना धनाचा अभिमान ।
तेणें जनार्दन रुष्ट होय ॥ १ ॥

नको नको मना लौकिकाचा पाश ।
तेणें जगदीश दुरावेल ॥ २ ॥

नको नको मना संसारीं आसक्ति ।
तेणें तो श्री-पति अंतरेल ॥ ३ ॥

स्वामी म्हणे मना होईं गा तूं भृंग ।
नित्य रमा-रंग-पाद-पद्मीं ॥ ४ ॥

[ १८३ ]

आघवा संसार झाला मोक्ष-मय।
होतां ज्ञानोदय अंतर्यामीं ॥ १ ॥

लाधलें सकळ साधनांचें फळ।
भेटला गोपाळ अखंडित ॥ २ ॥

काम क्रोध लोभ निमाले संपूर्ण।
झालें समाधान अनिर्वाच्य ॥ ३ ॥

स्वामी म्हणे आतां बैसलों निवांत।
हरिपायीं चित्त लावोनियां ॥ ४ ॥

[ १८४ ]

जगीं जो का बळी तो चि कान पिळी।
थोर मासा गिळी लहानातें ॥ १ ॥

कां गा लुबाडावे दीन असहाय।
साजे का हा न्याय मानवातें ॥ २ ॥

हें चि काय सांगें बुद्धीचें लक्षण।
करावें भक्षण दुर्बळांचें ॥ ३ ॥

स्वामी म्हणे ज्याचें ध्येय सर्वोदय।
धन्य तो चि होय मानवांत ॥ ४ ॥

[ १८५ ]

नका बोलों ऐसें झालों ब्रह्मज्ञानी ।
ब्रह्म बोलाहुनी वेगळें चि ॥ १ ॥
झोंपलों मी म्हणे असे चि तो जागा ।
कळों आलें जगा आपेंआप ॥ २ ॥
झालों म्हणे मुका तो चि तो बोलका ।
कळों आलें लोकां आपेंआप ॥ ३ ॥
आम्ही झालों म्हणे तें चि तया न्यून ।
मौन ही चि खूण स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १८६ ]

दीन मी अभागी होउनी भिकारी ।
कैसा दारोदारीं हिंडतसें ॥ १ ॥
मी चि भाग्यवंत होउनी सधन ।
वाटीतसें अन्न याचकांतें ॥ २ ॥
मी चि नर-नारी संन्यासी संसारी ।
नाना वेषधारी मी चि एक ॥ ३ ॥
स्वामी म्हणे झालों मी चि चराचर ।
नांदतों साचार एकला चि ॥ ४ ॥

अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

[१८७]

झालों ब्रह्म ऐसें बोलता अहंता ।
स्पर्शों पाहे चित्ता म्हणोनिया ॥ १ ॥
मन बुद्धिसहित समर्पिलें चित्त ।
राहिलों निवांत हरिपायीं ॥ २ ॥
आतां अहं सोऽहं मावळलें भान ।
अवघें नारायणरूप झालें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे ऐसें भक्तीचें महिमान ।
ओळखावी खूण स्वानुभवें ॥ ४ ॥

[१८८]

नाम-जपें जाय जळोनियां पाप ।
होय आपेंआप आत्म-शुद्धि ॥ १ ॥
नाम-जपें जाय काम क्रोध भय ।
होय मनोजय अनायासें ॥ २ ॥
जपा हरि-नाम जपा हरि-नाम ।
मार्ग हा सुगम वैकुंठींचा ॥ ३ ॥
स्वामी म्हणे आम्ही नामें चि सबळ ।
कांपे कळिकाळ आम्हांपुढें ॥ ४ ॥

[ १८९ ]

राम-नाम येतां कानीं ।
होय पातकांची धुनी ॥ १ ॥
राम-नाम घेतां वाचे ।
होय सार्थक देहाचें ॥ २ ॥
राम-नामाचें स्मरण ।
होतां चुके जन्म-मरण ॥ ३ ॥
उच्चारितां राम-नाम ।
स्वामी झाला पूर्ण-काम ॥ ४ ॥

[ १९० ]

जों जों धरी जीव प्रपंचाची आस ।
तों तों त्याचा फांस दृढावतो ॥ १ ॥
जों जों राहे जीव प्रपंचीं उदास ।
तों तों त्याचा फांस ढिला होय ॥ २ ॥
कां गा जासी वृथा प्रपंचीं गुंतून ।
पाहें विचारून सारासार ॥ ३ ॥
स्वामी म्हणे देहीं उदास राहून ।
करीं सोडवण तुझी तूं चि ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८११२

[ १९१ ]

जरी वाटे जीवा भेटावा श्रीपति ।
तरी व्हावा पोटीं अनुताप ॥ १ ॥

अनुतापाविण नाहीं चित्त-शुद्धि ।
न राहे तीं बुद्धि आत्म-निष्ठ ॥ २ ॥

आत्म-निष्ठ बुद्धि राहतां अखंड ।
मोडेल तें बंड प्रपंचाचें ॥ ३ ॥

प्रपंचाचें बंड मोडतां चि अंतीं ।
भेटतो श्री-पति स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १९२ ]

निर्वातींचा दीप तेवतो निवांत ।
तैसें राहो चित्त सर्वकाळ ॥ १ ॥

आला गेला मेघ उदास गगन ।
तैसें राहो मन सुख-दुःखीं ॥ २ ॥

असोनियां जळीं अलिप्त राजीव ।
राहो तैसा जीव उपाधींत ॥ ३ ॥

स्वामी म्हणे सदा असावें संतुष्ट ।
स्व-रूपीं प्रविष्ट होवोनियां ॥ ४ ॥

[ १९३ ]

कामक्रोधादिक विकारांच्या ऊर्मी ।
समर्पिल्या आम्ही हरिपायीं ॥ १ ॥
लौकिकाची लाज सांडिली सकळ ।
ओलांडिलीं कुळ जाति वर्ण ॥ २ ॥
अहंता लिगाड सारिलें सहज ।
वासनेचें बीज दग्ध केलें ॥ ३ ॥
पिंड ब्रह्मांडाचा गिळोनियां घांस ।
झालों हरिदास स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ १९४ ]

घेतां भोग नव्हे कामनेची तृप्ति ।
बळावे आसक्ति अमर्याद ॥ १ ॥
अग्निलागीं शांत करावया घृत ।
अर्पितां निभ्रांत प्रज्वाळे तो ॥ २ ॥
आत्मारामीं मन लावितां आवडी ।
क्षीण होय गोडी भोग्य-जातीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे प्रेमें स्मरा आत्माराम ।
तेणें पूर्ण-काम व्हाल तुम्ही ॥ ४ ॥

[ १९५ ]

नको नको मना दुर्जन-संगति ।
तेणें रमा-पति अंतरेल ॥ १ ॥
नको नको मना पाखंड-दर्शन ।
तेणें नारायण अंतरेल ॥ २ ॥
नको नको मना अभक्तांच्या गोष्टी ।
तेणें जगजेठी अंतरेल ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मना धरीं संत-संग ।
करीं रमा-रंग आपुलासा ॥ ४ ॥

[ १९६ ]

मागणें हें एक देईं भक्ति-प्रेम ।
देवा तुझें नाम गाईन मी ॥ १ ॥
आवडीनें देवा गुण मी वर्णीन ।
प्रेमें न्याहाळीन रूप तुझें ॥ २ ॥
भक्ति-भावें तुझें करीन पूजन ।
अंतरीं चिंतन निरंतर ॥ ३ ॥
स्वामी म्हणे पायीं ठेवीन मी माथा ।
तेणें माझ्या चित्ता समाधान ॥ ४ ॥

[ १९७ ]

विवेकाचा गांव वैराग्याचा ठाव ।
योगाचें वैभव साधुसंत ॥ १ ॥
भक्तीचें जिव्हार ज्ञानाचें भांडार ।
शांतीचें माहेर साधुसंत ॥ २ ॥
चैतन्याचा प्राण सुखाचें निधान ।
विश्रांतीचें स्थान साधुसंत ॥ ३ ॥
स्वामी म्हणे संत आनंदाची खाण ।
मूर्तिमंत जाण परब्रह्म ॥ ४ ॥

[ १९८ ]

सांपडलें मज अंतरीं निधान ।
सद्गुरु-चरण उपासितां ॥ १ ॥
अवघें त्रि-भुवन झालें सच्चिद्घन ।
आनंदें परिपूर्ण आत्म-रूप ॥ २ ॥
प्रकटला देव गेला देह-भाव ।
हारपला ठाव लौकिकाचा ॥ ३ ॥
स्वामी म्हणे आतां देवाचें दर्शन ।
नित्य घडे जाण आत्म-रूपीं ॥ ४ ॥

[ १९९ ]

असो कोणी चोर असो कोणी सात्र ।
तो चि दिसे देव मजलागीं ॥ १ ॥
उंच-नीच सान-थोर सुष्ट-दुष्ट ।
ऐसा झाला नष्ट भेदभाव ॥ २ ॥
नाम रूप वर्ण हारपलीं पूर्ण ।
राहिलों लक्षून आत्म-रूप ॥ ३ ॥
स्वामी म्हणे आतां कैचें जगद्भान ।
रंगलेंसे मन आत्मारामीं ॥ ४ ॥

[ २०० ]

मज अंतरींचा जाणोनियां भाव ।
पूर्ण करी देव मनोरथ ॥ १ ॥
आतां मजलागीं काय उणें जगीं ।
आवडीनें भोगीं शांति-सुख ॥ २ ॥
झालें अंतर्बाह्य देवाचें दर्शन ।
स्थिरावलें मन देवापायीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे सुख भोगितां अमूप ।
झालों सुख-रूप आपेंआप ॥ ४ ॥

[ २०१ ]

प्रपंचाचा त्रास न साहे जीवास ।
नको येथें वास ऐसें वाटे ॥ १ ॥
म्हणे रांडा पोरें मरती तरी बरें ।
मज ह्या संसारें गांजिलेंसे ॥ २ ॥
वैतागला प्राणी ऐसें मनीं आणी ।
निघावें सोडोनी घर-दार ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मन झालें पराधीन ।
नव्हे हें लक्षण वैराग्याचें ॥ ४ ॥

[ २०२ ]

क्षणोक्षणीं हा चि करावा विवेक ।
काय तें मायिक काय सत्य ॥ १ ॥
नाम रूप गुण मिथ्या नाशिवंत ।
एक तें शाश्वत आत्म-पद ॥ २ ॥
विषयांचें सुख नश्वर मायिक ।
तेथें अरोचक असों द्यावें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे माळ घालिते विरक्ति ।
बळावतां प्रीति आत्म-रूपीं ॥ ४ ॥

[ २०३ ]

प्रपंचीं असावें उदास वर्तन ।
आवरावें मन विवेकानें ॥ १ ॥

असो घरदार कुटुंब संसार ।
नये त्याचा भार वाटों देवों ॥ २ ॥

सुखें वैराग्याचा करावा अभ्यास ।
प्रपंचाचा त्रास मानूं नये ॥ ३ ॥

स्वामी म्हणे देहीं न जावें गुंतून ।
ही चि असे खूण वैराग्याची ॥ ४ ॥

[ २०४ ]

तो चि एक भक्त नव्हे जो विभक्त ।
राहे योग-युक्त अखंडित ॥ १ ॥

होउनियां देव करी देव-पूजा ।
जरी तो सायुज्या पातला चि ॥ २ ॥

साधिलें स्व-हित गांठिलें अद्वैत ।
तरी भक्ति-पंथ सोडी चि ना ॥ ३ ॥

स्वामी म्हणे भक्त ईश्वराचा प्राण ।
ईश्वर प्रमाण भक्तातें हि ॥ ४ ॥

[ २०५ ]

न होती ते भक्त उच्चारुनी नाम ।
पोटीं क्रोध काम असे जरी ॥ १ ॥
न होती ते भक्त करितां कीर्तन ।
दंभ मोह मान वसे जरी ॥ २ ॥
न होती ते भक्त घालोनियां माळा ।
भक्तीचा जिव्हाळा नसे जरी ॥ ३ ॥
स्वामी म्हणे व्यर्थ पूजा घंटा-नाद ।
भेटे ना गोविंद भक्तीविण ॥ ४ ॥

[ २०६ ]

उच्चारितां नाम आनंदलें मन ।
दाटले लोचन प्रेमाश्रूंनीं ॥ १ ॥
घामेजली काया झाली रोमांचित ।
थरारे कंपित होवोनियां ॥ २ ॥
कंठ सद्गदित स्तब्ध झालें चित्त ।
होती विगलित सर्व गात्रें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे अंतीं गेलें देह-भान ।
प्रेमें होतां लीन आत्म-रूपीं ॥ ४ ॥

[ २०७ ]

घर दार अन्न वस्त्र-प्रावरण ।
अधिक त्याहून काय हवें ॥ १ ॥
दारा सुत धन आप्त-इष्ट-जन ।
अधिक त्याहून काय हवें ॥ २ ॥
देह आणि मन आरोग्य-संपन्न ।
अधिक त्याहून काय हवें ॥ ३ ॥
संतांचें पूजन ईश्वराचें ध्यान ।
अधिक त्याहून काय हवें ॥ ४ ॥
स्वामी म्हणे व्हावें विश्वाचें कल्याण ।
तेणें समाधान मज होय ॥ ५ ॥

[ २०८ ]

जरी तो दर्दुर सर्प-मुखीं गेला ।
तरी आस त्याला मासियेची ॥ १ ॥
तैसी प्राणियासी न सोडवे तृष्णा
लागलीसे प्राणा तात जरी ॥ २ ॥
घडी घडी काळ भक्षितो आयुष्य ।
परी ह्याचें लक्ष प्रपंचांत ॥ ३ ॥
स्वामी म्हणे जीवा होईं गा सावध ।
घेईं वेगें वेध माधवाचा ॥ ४ ॥

[२०९]

नको मना होऊं इंद्रियांचा दास।
विषयांचा फांस दृढावेल॥ १॥
नको मना राहूं प्रपंचीं निमग्न।
होसील तूं खिन्न परिणामीं॥ २॥
नको नको मना धन मान तृष्णा।
अंतीं विटंबना टळे कैसी॥ ३॥
स्वामी म्हणे करीं हरिचें चिंतन।
नित्य समाधान पावसील॥ ४॥

[२१०]

विश्वीं विश्वंभर।
हरि-रूप चराचर॥ १॥
हरि पासीं हरि दूर।
हरि अंतरीं बाहेर॥ २॥
हरि सान हरि थोर।
हरि-रूप नारी-नर॥ ३॥
हरि-रूप अहंकार।
स्वामी हरि चि साचार॥ ४॥

[ २११ ]

भूत-भविष्याचें भान ।
आम्ही नेणों वर्तमान ॥ १ ॥
सदा सर्वकाळ जाण ।
आत्म-रूपीं सावधान ॥ २ ॥
आम्ही ठाईं चि निर्गुण ।
आम्हां कैंचें जन्म-मरण ॥ ३ ॥
स्वामी म्हणे आत्म-पणें ।
आम्हां सर्वत्र नांदणें ॥ ४ ॥

[ २१२ ]

जरी होय शुद्ध चित्त ।
तरी विषाचें अमृत ॥ १ ॥
येई माराया धांवोन ।
तो चि करी संरक्षण ॥ २ ॥
जन-निंदेचीं भूषणें ।
होतीं विघ्नांचीं सुमनें ॥ ३ ॥
नाना आघात आपत्ति ।
तीं हि सौख्य-फल देती ॥ ४ ॥
स्वामी म्हणे शत्रु मित्र ।
आत्म-रूप तें सर्वत्र ॥ ५ ॥

[ २१३ ]

पोटीं भाव तरी पाणी होय तीर्थ ।
पर्ण तें यथार्थ पत्रीरूप ॥ १ ॥

दूध दहीं घृत शर्करासहित ।
मधु पंचामृत तें चि होय ॥ २ ॥

अन्नाचा प्रसाद राख ती विभूति ।
तांदूळ ते होती मंत्राक्षता ॥ ३ ॥

स्वामी म्हणे जेथें भाव तेथें देव ।
भावाचें गौरव काय वानूं ॥ ४ ॥

[ २१४ ]

सद्गुरु-स्वरूप अगाध अपार ।
काय मी पामर कैसें वानूं ॥ १ ॥

देखतां चि पडे ब्रह्मादिकां मौन ।
निर्गुणाचे गुण काय बोलूं ॥ २ ॥

नव्हे तें निर्गुण नव्हे तें सगुण ।
तयाचें लक्षण काय सांगूं ॥ ३ ॥

स्वामी म्हणे भाव ठेवा पायापासीं ।
तरी चि तुम्हांसी आतुडेल ॥ ४ ॥

[ २१५ ]

काम क्रोध लोभ ठेवोनी अंतरीं ।
पाहों जातां हरी कैंचा दिसे ॥ १ ॥
काम तेथें पुष्टि क्रोध तेथें शांति ।
लोभ तेथें तृप्ति राहे कैंची ॥ २ ॥
काम क्रोध खळ पापी अमंगळ ।
समूळ चांडाळ त्यजावे ते ॥ ३ ॥
स्वामी म्हणे चित्त करावें निर्मळ ।
तरी चि गोपाळ राहे तेथें ॥ ४ ॥

[ २१६ ]

बैसोनी एकांतीं करीं सोऽहं-ध्यान ।
तेणें तुझें मन स्थिरावेल ॥ १ ॥
' सोऽहं ' ' सोऽहं ' ऐसा शब्दाविण जप ।
होतां आपेंआप चित्त-शुद्धि ॥ २ ॥
कैंसा शब्दाविण होतो ' सोऽहं-ध्वनि ' ।
घेईं विचारोनी संतांपासीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे जाईं संतांसीं शरण ।
तेणें उद्धरण होय तुझें ॥ ४ ॥

[ २१७ ]

देहाची आसक्ति ठेविसील चित्तीं ।
तरी तुज अंतीं दुःख आहे ॥ १ ॥
नित्य आत्म-रूपीं राहें सावधान ।
तेणें देह-भान हारपेल ॥ २ ॥
प्रपंचाचा अंत होईल निभ्रांत ।
लाभतां एकांत जीव-शिवा ॥ ३ ॥
स्वामी म्हणे देही असोनी विदेही ।
होसील लवलाहीं शांतिरूप ॥ ४ ॥

[ २१८ ]

माझा प्राण माझी बुद्धी माझें मन ।
दारा सुत धन माझें माझें ॥ १ ॥
माझीं हीं इंद्रियें माझें हें शरीर ।
आहे घर-दार माझें माझें ॥ २ ॥
माझा देश माझें कुळ माझा वर्ण ।
ऐसें बोले कोण 'माझें माझें' ॥ ३ ॥
स्वामी म्हणे शोध घेतां अंतर्यामीं ।
जिरेल ती ऊर्मी मीपणाची ॥ ४ ॥

[ २१९ ]

म्हणतां ' माझा ' देह मी तों नव्हें देह ।
आहें निःसंदेह आत्म-रूप ॥ १ ॥
सुख-दुःख-वार्ता देहाचिया माथां ।
लावुनी तत्त्वतां वेगळा मी ॥ २ ॥
गेलें क्रिया-कर्म ठेले धर्माधर्म ।
कळों आलें वर्म परमार्थाचें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे गेला देह-अहंकार ।
झाला साक्षात्कार स्व-रूपाचा ॥ ४ ॥

[ २२० ]

पाहों जातां मूळ अहंता तत्त्वतां ।
उरे आत्म-सत्ता एकली चि ॥ १ ॥
तेथें अहं सोऽहं नुरे वृत्ति-भेद ।
स्फुरे चिदानंद एकला चि ॥ २ ॥
जाणीव नेणीव गळे द्वैत-भाव ।
खेळे स्वयमेव पर-ब्रह्म ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मूळीं झाला वृत्ति-लोप ।
विश्व आत्म-रूप तयालागीं ॥ ४ ॥

[ २२१ ]

देवपिसा झालों नामीं आनंदलों।
आतां नका बोलों दुज्या गोष्टी ॥ १ ॥
प्रपंचाची वार्ता न ये माझ्या कानीं।
न देखें नयनीं जन-लोक ॥ २ ॥
जेथें पाहें तेथें दिसे वासुदेव।
वेडावला जीव जडे पायीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे माझी रंगली हे वृत्ति।
आठवितां चित्तीं वासुदेव ॥ ४ ॥

[ २२२ ]

आद्रोत कोणी सुखें लोक-सेवा।
आम्हांसी बरवा भक्ति-मार्ग ॥ १ ॥
सांगोत ते कोणी वेदांताचें ज्ञान।
न मानूं प्रमाण भक्तिविण ॥ २ ॥
करोत ते कोणी जप-तप-ध्यान।
आम्हांसी साधन भोळाभाव ॥ ३ ॥
स्वामी म्हणे देव भावाचा भुकेला।
'ओ' देई हांकेला भक्ताचिया ॥ ४ ॥

[ २२३ ]

असो सार्वभौम राजा चक्रवर्ती ।
चुके चि ना अंतीं काळ-पाश ॥ १ ॥
असो बाळ-वृद्ध असो नारी-नर ।
भ्याड किंवा शूर असो कोणी ॥ २ ॥
पंडित अजाण सज्जन दुर्जन ।
सधन निर्धन असो कोणी ॥ ३ ॥
असो सुलक्षण सुरूप तरुण ।
टळे ना मरण कोणासी हि ॥ ४ ॥
स्वामी म्हणे एक जगीं आत्म-ज्ञानी ।
मृत्यूतें मारुनी राहिलासे ॥ ५ ॥

[ २२४ ]

काळाची गर्जना नये कानावरी ।
जोंवरी शरीरीं बलोन्माद ॥ १ ॥
प्रपंचांत सौख्य मानी मूढपणें ।
न जाणे खेळणें काळाचें तें ॥ २ ॥
होतां शक्तिहीन शरीर तें क्षीण ।
राहेल मरण डोळ्यांपुढें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे अंतीं घडे पश्चात्ताप ।
काळाची झडप पडे जेव्हां ॥ ४ ॥

[ २२५ ]

जेणें अंतरती हरि तुझे पाय ।
करावे ते काय चमत्कार ॥ १ ॥

कशासाठीं व्हावी वश ऋद्धि सिद्धि ।
नांवाची प्रसिद्धि कशासाठीं ॥ २ ॥

मज तृणवत् गमे हें प्राकृत ।
आहे आत्म-हित तुझे पायीं ॥ ३ ॥

स्वामी म्हणे माझें एक तूं निधान ।
नाहीं समाधान तुजविण ॥ ४ ॥

[ २२६ ]

हरि तुझी मूर्ति दिसे सर्वां भूतीं ।
असे तुझी वस्ती चराचरीं ॥ १ ॥

तुजविण ठाव नसे अणुमात्र ।
व्यापुनी सर्वत्र राहिलासी ॥ २ ॥

काय वर्णूं तुझें नाम रूप गुण ।
सगुण निर्गुण तूं चि एक ॥ ३ ॥

स्वामी म्हणे तूं चि विश्वाचें जीवन ।
समर्पिलें मन तुझ्यापायीं ॥ ४ ॥

[ २२७ ]

जन्मोनियां नाहीं केलें आत्म-हित ।
वेंचिलें जीवित वाउगें चि ॥ १ ॥
प्रपंचाचा भार वाहोनियां शिरीं ।
देह नानापरी कष्टविला ॥ २ ॥
नाशिवंत देह पावेल पतन ।
अंतीं समाधान कैचें राहे ॥ ३ ॥
स्वामी म्हणे होईं आधीं चि सावध ।
वेगें घेईं शोध स्वरूपाचा ॥ ४ ॥

[ २२८ ]

सदा माझें मन राहो सावधान ।
कदा न हो भान प्रपंचाचें ॥ १ ॥
चैतन्यीं तद्रूप होवो माझें चित्त ।
नायकोनी मात विषयांची ॥ २ ॥
जडो माझा जीव नित्य पर-ब्रह्मीं ।
अहंकार-ऊर्मि सांडोनियां ॥ ३ ॥
स्वामी म्हणे घडो अभेद-भजन ।
सहज-समाधान निरंतर ॥ ४ ॥

[ २२९ ]

बाह्य सुखालागीं धांवतो हा जीव ।
यंत्र-युगें हांव वाढविली ॥ १ ॥
अंतरींच्या सुखा होउनी पारखा ।
दुःखाचिया नरकामाजीं पडे ॥ २ ॥
करावया क्रांति सत्याग्रही वीर ।
पुढें येती धीर धरोनियां ॥ ३ ॥
स्वामी म्हणे होय सत्याचा विजय ।
सत्य तें निर्भय आदि-अंतीं ॥ ४ ॥

[ २३० ]

यंत्र-युगें घोर माजला आकांत ।
बळावला प्रांत दुर्जनांचा ॥ १ ॥
शास्त्रज्ञांचे शोध योजिती उन्मत्त ।
साधावया घात दुर्बलांचा ॥ २ ॥
लोभ अहंकार वाढती अपार ।
नीति-धर्मा थार नुरे कोठें ॥ ३ ॥
पाशवी संस्कार घालिती ते पिंगा ।
गुप्त झाली गंगा मानव्याची ॥ ४ ॥
स्वामी म्हणे नाहीं स्वरूपाचा शोध ।
व्यर्थ तो प्रबोध शास्त्रज्ञांचा ॥ ५ ॥

[ २३१ ]

लोळे विषयांत चंचळ हें चित्त ।
न राहे निवांत क्षणभरी ॥ १ ॥
म्हणुनी काकुळती आलों तुझ्या दारीं ।
तारीं किंवा मारीं पांडुरंगा ॥ २ ॥
आतां तुझे पाय न सोडीं विठ्ठला ।
जावो जरी गेला जीव माझा ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मज तुजविण त्राता ।
नसे चि अनंता दुजा कोणी ॥ ४ ॥

[ २३२ ]

येईं रखुमाईच्या वरा ।
हात देईं ह्या पामरा ॥ १ ॥
बुडालों मी भव-सागरीं ।
धांव पाव गा लौकरी ॥ २ ॥
नको पाहूं माझा अंत ।
मी तों अजाण पतित ॥ ३ ॥
मज नेईं पैल तीरा ।
तूं चि पतित-पावन खरा ॥ ४ ॥
स्वामी म्हणे उडी घालीं ।
ब्रीद आपुलें सांभाळीं ॥ ५ ॥

[ २३३ ]

देहाची आसक्ति बाळगिली थोर ।
नव्हता निर्धार आत्मयाचा ॥ १ ॥
तेणें चित्तीं भय सांठलें अपार ।
दाटला अंधार चोहींकडे ॥ २ ॥
तों चि अकस्मात् पातला गणनाथ ।
' ना भी ' ऐसा देत नाभिकार ॥ ३ ॥
झणीं सोऽहं-दीप लावुनी अंतरीं ।
म्हणे गा निर्धारीं आत्म-रूप ॥ ४ ॥
स्वामी म्हणे माथां ठेवितांचि हात ।
निर्भय निवांत जाहलों मी ॥ ५ ॥

[ २३४ ]

कोण मी कोठील कां गा जन्मा आलों ।
नाम-रूप ल्यालों कासयासी ॥ १ ॥
कर्म तें करावें कोणतें उचित ।
पावें आत्म-हित कैशापरी ॥ २ ॥
क्षणोक्षणीं ऐसा करावा विचार ।
कैसा भव-पार पावेन मी ॥ ३ ॥
भंगुर ते भोग वाटती ना गोड ।
लागलीसे ओढ परमार्थाची ॥ ४ ॥
स्वामी म्हणे ऐसी पावतां हे दशा ।
सद्गुरु आपैसा भेटेचि गा ॥ ५ ॥

[ २३५ ]

घेईं घेईं जीवा स्व-रूपाचा ध्यास ।
पुरे हा हव्यास प्रपचाचा ॥ १ ॥
विटे ऐसी गोडी नव्हे स्व-रूपाची ।
सांगती ऐसें चि साधु-संत ॥ २ ॥
संतांचे वचनीं ठेवोनी विश्वास ।
करीं गा अभ्यास आवडीनें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे भावें भोगीं आत्मानंद ।
अवीट अखंड शांति-रूप ॥ ४ ॥

[ २३६ ]

नको होऊं मना इंद्रियांचा दास ।
प्रपंचीं उदास राहें सदा ॥ १ ॥
हरि-पायीं भाव ठेवीं एक-निष्ठ ।
न मानीं वरिष्ठ दुजें कांहीं ॥ २ ॥
लौकिकाचा संग दुःखासी कारण ।
करी नागवण स्व-हिताची ॥ ३ ॥
स्वामी म्हणे होईं हरि-पायीं लीन ।
तरी चि कल्याण पावसील ॥ ४ ॥

[ २३७ ]

नको नको मना गुंतूं संसारांत ।
स्व-हिताचा घात होय जेणें ॥ १ ॥
होईं सावधान चिंतीं नारायण ।
तेणें चि कल्याण पावसी तूं ॥ २ ॥
हरि-पदांबुजीं घालोनियां रुंजी ।
चैतन्याच्या कुंजीं वास करीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे होसी चैतन्याचें रूप ।
तरी आपेंआप समाधान ॥ ४ ॥

[ २३८ ]

आदरीं संसार करीं व्यवहार ।
परी सारासार विचारीं गा ॥ १ ॥
विचारीं गा सुख आपुलें पराचें ।
ध्येय मानव्याचें लक्षोनियां ॥ २ ॥
लक्षोनियां धर्म भोगीं अर्थ-काम ।
सुखें मोक्ष-धाम पावावया ॥ ३ ॥
पावावया शांति यावया विरक्ति ।
असो पुष्टि तुष्टि स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ २३९ ]

द्यावें तैसें घ्यावें केलें तें भोगावें।
ऐसें हें स्वभावें ओघा येतें ॥ १ ॥

कां गा वृथा द्यावा आणिकांतें बोल।
अंतर्यामीं खोल विचारावें ॥ २ ॥

आपुले आपण होवोनियां वैरी।
कष्टतां संसारीं सुख कैचें ॥ ३ ॥

स्वामी म्हणे करा ढोपराशीं न्याय।
उगा चि कां धाय मोकलितां ॥ ४ ॥

[ २४० ]

कां रे प्राण्या जासी गुंतुनी संसारीं।
सुखाशेच्या भरीं भरोनियां ॥ १ ॥

धरों जातां सुख धांवे पुढां पुढां।
व्यर्थ तूं बापुडा श्रमी होसी ॥ २ ॥

प्राशितां मृग-जळ काय तृषा भागे।
कैसा माया-संगें भुललासी ॥ ३ ॥

स्वामी म्हणे वेगें होईं एकचित्त।
कांहीं आत्म-हित विचारीं गा ॥ ४ ॥

[ २४१ ]

काळ जातो प्रतिक्षण ।
तुज येईल मरण ॥ १ ॥
अंतीं राहिले सब्र्वगडे ।
एकलें चि जाणें पडे ॥ २ ॥
आप्त इष्ट गण-गोत ।
सवें नाहीं कोणी येत ॥ ३ ॥
स्वामी म्हणे तूं एकला ।
जाग जाग स्व-हिताला ॥ ४ ॥

[ २४२ ]

ओळखीं स्व-रूप नको होऊं भ्रांत ।
अनादि अनंत आहेसी तूं ॥ १ ॥
देह मिळे अंतीं पंच-महाभूतीं ।
स्थिति त्यापरती असे तुझी ॥ २ ॥
नामरूपात्मक मायिक संसार ।
नित्य निर्विकार तूं चि एक ॥ ३ ॥
स्वामी म्हणे सोडीं सोडीं देहाहंता ।
सुखें भोगीं सत्ता सोऽहं-रूप ॥ ४ ॥

[ २४३ ]

तुझे देह भिन्न माझे देह भिन्न।
ऐसा हा अभिमान कासयासी ॥ १ ॥
एक चि अभिन्न आत्म-तत्त्व पाहीं।
द्रष्टा दृश्य नाहीं भाव जेथें ॥ २ ॥
चार हि देहांचा करोनी निरास।
उन्मनीपदास गांठीं बापा ॥ ३ ॥
स्वामी म्हणे जिणें तरी चि सफळ।
नातरी केवळ भारभूत ॥ ४ ॥

[ २४४ ]

कर्तृत्वाचा मद सांडोनी समस्त।
करीं यथोचित कर्में सारीं ॥ १ ॥
कर्म-फलाठायीं न ठेवीं आसक्ति।
अलिप्तता चित्तीं असों देईं ॥ २ ॥
घडे तें तें कर्म होतां कृष्णार्पण।
कर्माचें बंधन उरे कोठें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे कर्में करोनी सकळ।
संन्यासाचें फळ अनायासें ॥ ४ ॥

[ २४५ ]

नको देह-दंड नको व्रत-नेम ।
पाहें आत्माराम अंतर्यामीं ॥ १ ॥
नको हिंडूं तीर्थ नको धुंडूं रान ।
राहे दया-घन अंतर्यामीं ॥ २ ॥
नाम तेथें राम भक्तांचा आराम ।
निष्कामांचा काम नांदतसे ॥ ३ ॥
अंतरीं चि नाम अंतरीं चि राम ।
अंतरीं विश्राम स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ २४६ ]

जेथें जेथें माझें हिंडेल हें मन ।
तुझें चि दर्शन तेथें होवो ॥ १ ॥
तुजविण देवा न दुजी वासना ।
शिवो माझ्या मना कदाकाळीं ॥ २ ॥
वाहो माझें मन तुझा चि संकल्प ।
तेणें आपेंआप स्थिरावेल ॥ ३ ॥
स्वामी म्हणे माझी पूर्ण करीं आस ।
ना तरी उदास जिणें वाटे ॥ ४ ॥

[ २४७ ]

सांगशील तैसा वर्तेन अनंता ।
जाणतसें सत्ता एक तुझी ॥ १ ॥
आपुलें व्यक्तित्व वाहिलें चरणीं ।
घ्यावें सांभाळोनी आतां मज ॥ २ ॥
तुझ्या चि नामाचा घेउनी आधार ।
पाववीन पार जड जीवां ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मज तुझें कृपा-बळ ।
म्हणोनि हा खेळ खेळतसें ॥ ४ ॥

[ २४८ ]

श्वासोच्छ्वासीं देख राम-नाम-जप ।
होतो आपेंआप अखंडित ॥ १ ॥
तेथें रात्रं-दिन ठेवीं अनुसंधान ।
सांडुनी मीपण सोऽहं-भावें ॥ २ ॥
राम-नामीं चित्त रंगतां स्वानंदें ।
सुखें हाता चढे तत्त्व-बोध ॥ ३ ॥
होतां तत्त्व-बोध लाभे परा शांति ।
जीवासी विश्रांति स्वामी म्हणे ॥ ४ ॥

[ २४९ ]

देसी तरी देईं देवा मजप्रति ।
संतांची संगति सर्वकाळ ॥ १ ॥
हें चि एक मज पुरे वर-दान ।
न मागें ह्याहून दुजें कांहीं ॥ २ ॥
आवडीनें जीव जडो संतांपायीं ।
भावें घडो कांहीं सेवा त्यांची ॥ ३ ॥
स्वामी म्हणे रंगें नित्य संत-संगें ।
होईन निजांगें शांति-रूप ॥ ४ ॥

[ २५० ]

भलें देवा मज केलेंसी दुर्बळ ।
तेणें चि निर्मळ जाहलों मी ॥ १ ॥
कैसें नेणें तुझें झालें विस्मरण ।
बळानें संपन्न होतों जेव्हां ॥ २ ॥
शरीर सबळ असो वा दुर्बळ ।
तुज सर्वकाळ आठवीन ॥ ३ ॥
स्वामी म्हणे मन करोनियां शुद्ध ।
तुझ्या चि सन्निध राहेन मी ॥ ४ ॥

[ २५१ ]

कोण पाहे देह सबळ दुर्बळ ।
झालों मी केवळ ब्रह्म-रूप ॥ १ ॥
कोण पाहे आतां संपत्ति विपत्ति ।
जाहलीसे मति आत्म-रूप ॥ २ ॥
प्रपंचाचा ठाव गेला भेद-भाव ।
प्रकटला देव अंतर्यामीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे कैंचें उरे देह-भान ।
होतां चि तल्लीन आत्म-रूपीं ॥ ४ ॥

[ २५२ ]

आलीं विघ्नें दूर सारुनी सहज ।
उद्धरिलें मज पांडुरंगें ॥ १ ॥
लडिवाळपणें घेतली जे आळी ।
ते तूं पूर्ण केली आवडीनें ॥ २ ॥
सर्वकाळ माझें लक्षोनियां हित ।
सांभाळूनी नीट चालविलें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे कैसा होऊं उतराई ।
तुझ्या पायीं डोई ठेवियेली ॥ ४ ॥

[ २५३ ]

आड येतां विघ्न सोडी सुदर्शन ।
भक्तां नारायण सांभाळितो ॥ १ ॥
धरोनियां हात नेई पैलतीरा ।
सोडवी संसारापासोनियां ॥ २ ॥
पतित-पावन अनाथांचा नाथ ।
पुरवी मनोरथ भाविकांचे ॥ ३ ॥
स्वामी म्हणे होई दासाचा हि दास ।
येई नाना वेष धरोनियां ॥ ४ ॥

[ २५४ ]

लौकिकाची मात सांडावी समस्त ।
सेवावा एकांत आवडीनें ॥ १ ॥
निर्वातींचा दीप तेवतो निवांत ।
तैसी वृत्ति शांत असों द्यावी ॥ २ ॥
अहंतेची नीद न लागो जीवास ।
जागो सोऽहं-ध्यास निरंतर ॥ ३ ॥
ठाईंचि बैसोन करावें साधन ।
भावें व्हावें लीन गुरुपायीं ॥ ४ ॥
स्वामी म्हणे तुम्हीं दिगंबरदास ।
रहावें उदास देह-धर्मी ॥ ५ ॥

[ २५५ ]

‘ अहं देह ’ वृत्ति पावते विनाश ।
येतां उदयास आत्म-ज्ञान ॥ १ ॥
अज्ञानाचा नाश करोनियां ज्ञान ।
होतसे विलीन आत्म-रूपीं ॥ २ ॥
‘ अहं आत्मा ’ ह्या हि वृत्तीची निवृत्ति ।
आत्म-रूप-स्थिति ती चि जाण ॥ ३ ॥
स्वामी म्हणे कैंची प्रवृत्ति निवृत्ति ।
शब्दातीत स्थिति स्वरूपाची ॥ ४ ॥

[ २५६ ]

नाना रूपीं विश्वीं नटलेंसे भासे ।
परी एक असे आत्म-रूप ॥ १ ॥
जैसे सान थोर होती अलंकार ।
परी तें साचार सुवर्ण चि ॥ २ ॥
वस्त्रीं ओत-प्रोत तंतु चि केवळ ।
तरंगीं तें जळ अभिन्नत्वें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे तैसें विश्वीं निरंतर ।
स्थिर अविकार आत्म-तत्त्व ॥ ४ ॥

[ २५७ ]

छाया तैसा देह मानितों स्वभावें।
नाहीं आम्हां ठावें सुख-दुःख ॥ १ ॥
जन्म-मरणाचा संपला संसार।
झाला साक्षात्कार स्व-रूपाचा ॥ २ ॥
कैंचा देश-काळ विश्व चि केवळ।
माया-मृगजळ कळों आलें ॥ ३ ॥
स्वामी म्हणे आम्ही अनादि अनंत।
सुख-दुःखातीत स्वयंसिद्ध ॥ ४ ॥

[ २५८ ]

काम-क्रोध-व्यथा नाहीं भय चिंता।
संसाराची वार्ता दूर ठेली ॥ १ ॥
लौकिकाचा पांग फेडिला सहजें।
सांडोनियां ओझें अहंतेचें ॥ २ ॥
न सोडवे मज आत्म-सुख गोडी।
भावें दिली बुडी प्रेम-रंगीं ॥ ३ ॥
स्वामी म्हणे आतां झालों सुख-रूप।
कोण करी माप स्वानंदाचें ॥ ४ ॥

[ २५९ )

देह नव्हे ऐसा केलों गुरु-रायें ।
देखिली म्यां सोये स्व-रूपाची ॥ १ ॥

जन्म-मरणाची संपली ते वार्ता ।
दूर ठेली चिंता संसाराची ॥ २ ॥

आतां आत्म-रूप झालें त्रि-भुवन ।
हारपलें भान दिक्कालाचें ॥ ३ ॥

स्वामी म्हणे मन होतां चि उन्मन ।
लाधलें निधान स्वानंदाचें ॥ ४ ॥

[ २६० ]

कैंचा आत्मा कैंचा देह ।
माझा मी चि निःसंदेह ॥ १ ॥

कैंचें कर्म कैंचा कर्ता ।
अवघी एक माझी सत्ता ॥ २ ॥

कैंचें विश्व कैंचें भान ।
मी चि आपणा प्रमाण ॥ ३ ॥

गिळोनियां मीतूंपण ।
स्वामी झाला सच्चिद्घन ॥ ४ ॥

[ २६१ ]

राम-नामीं रंगे मन ।
कैंची भूक कैंची तहान ॥ १ ॥
कैंचा राहे देह-भाव ।
नुरे दिक्कालासी ठाव ॥ २ ॥
कैंची आधि कैची व्याधि ।
अवघी संपली उपाधि ॥ ३ ॥
नित्य निवांत निर्भय ।
स्वामी झाला राममय ॥ ४ ॥

हरये नमः । हरये नमः । हरये नमः ।

श्री कृष्णार्पणमस्तु

## आरती श्रीज्ञानदेवाची

आरती ज्ञानराजा महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत मनु वेधला माझा ॥ ध्रु० ॥
लोपलें ज्ञान जगीं हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग नाम ठेविलें ज्ञानी ॥ १ ॥
कनकाचें ताट करीं उभ्या गोपिका नारी ।
नारद तुंबरू हो साम-गायन करी ॥ २ ॥
प्रकट गुह्य बोले विश्व ब्रह्म चि केलें ।
रामजनार्दनीं पायीं टक चि ठेलें ॥ ३ ॥

— ०समाप्त० —

परिशिष्ट

[ श्रीभगवान् वासुदेव अभंगाचे शेवटीं *नाम-निर्देश करण्याविषयीं संतांह्यातीं निरोप पाठवितात. ]

[ १ ]

अहो जी उदारा विनंति अवधारा।
आमुच्या अंतरा तोषवाया ॥ १ ॥

अभंगाशेवटीं नामाचा निर्देश।
करणें सुयश जोडावया ॥ २ ॥

परंपरागत आलें जें कां लोण।
तयाचें पालन घडावें कीं ॥ ३ ॥

संत-कवि-क्रम ऐसा चि नेमस्त।
आला अनुस्यूत दिसतसे ॥ ४ ॥

अनिर्दिष्टनाम काव्य गमे उणें।
केली मिठाविणें पाक-सिद्धि ॥ ५ ॥

'राम' म्हणे नाम प्रबोधाचें धाम।
सार्थक परम भावार्थाचें ॥ ६ ॥

---

*टीप :—स्वामीजींनीं प्रथम जे अभंग रचले त्यांचे शेवटीं 'स्वामी म्हणे' असा नाम-निर्देश केला नव्हता. पुढें त्यांनीं ते अभंग आपले स्नेही भगवद्भक्त डॉ. रामभाऊ परांजपे (सं-जीवन चिकित्सालय, रत्नागिरी) ह्यांस वाचावयास दिले. ते वाचून पाहिल्यावर त्यांस वरील

[ २ ]

आधीं जेणें केलें मग सांगितलें ।
त्याच्या शब्दा आलें सामर्थ्य कीं ॥ १ ॥

सांगतो लोकांसी ब्रह्म-ज्ञान गोष्टी ।
कोरडा आद्यंतीं पाषाण चि ॥ २ ॥

अधिकाराविणें जें जें कीं बोलणें ।
भुंकोनियां सुणें गेलें जैसें ॥ ३ ॥

उपदेशायोग्य अधिकारीपण ।
तरी प्रबोधन जना होय ॥ ४ ॥

उपदेश कोण करीत ह्याच्यांत ।
महत्त्व निभ्रांत येत असे ॥ ५ ॥

नामाचे नि योगें व्यक्तित्वाचा ठसा ।
उठत आपैसा जन-मनीं ॥ ६ ॥

भावार्थाचा ठसा उठत वठोनी ।
अंकुरे ठसोनी अंतर्यामीं ॥ ७ ॥

ऐकावया नांव अभंगाशेवटीं ।
उत्सुकता उठी ' राम ' म्हणे ॥ ८ ॥

---

[ मागील पानावरून पुढें चालू ]

जे चार अभंग स्फुरले ते त्यांनीं स्वामीजींकडे पाठवून दिले. तो देवाचाच संदेश मानून स्वामीजींनीं सर्व अभंगांचे शेवटीं ' स्वामी म्हणे ' असा निर्देश केला.

[ ३ ]

नामा आणि रूपा जेथें नाहीं ठाव ।
नामाचें वैभव कासयासी ॥ १ ॥

नामरूपातीत स्वयंभू संचलें ।
परि तें नटलें नाम-रूपीं ॥ २ ॥

फळला सद्भाव गळला अभिमान ।
नाम-रूप-भान हारपलें ॥ ३ ॥

गाजावें आपुलें जगामाजीं नांव ।
ऐसी कैंची हांव स्पर्शो शके ॥ ४ ॥

ज्याचें नांव घेतां ये विश्व-वंद्यता ।
निंद्य हि प्राकृता अभक्तासी ॥ ५ ॥

लोक-हितासाठीं नांवाचें महत्त्व ।
उद्दिष्ट कार्यांत साहाय्यक ॥ ६ ॥

नाम-रूप-गुण-संबंध सोडून ।
नामाचें वर्णन ' राम ' करी ॥ ७ ॥

[ ४ ]

आपुल्या मुखींची अमृत-सरिता ।
सदैव प्राशितां तृप्ति नोहे ॥ १ ॥

वाचेचा दुर्बळ मति-मंद केवळ ।
बोलिलों जे बोल बोलूं नये ॥ २ ॥

नव्हे उपदेश मूर्ख मी बालक ।
वाचेचा चालक जगदीश ॥ ३ ॥

अहंता सोऽहंता सांडुनी कोऽहंता ।
बोल हे बोलता तव कृपें ॥ ४ ॥

आपुलें आपणा केलें निवेदन ।
न्यूनाधिक पूर्ण सरतें करा ॥ ५ ॥

आत्मारामीं ‘ राम ’ घेतसे विश्राम ।
भागा आलें काम करोनियां ॥ ६ ॥

[ श्रीभगवान् वासुदेवाचे संदेशानुसार अभंगाचे शेवटीं 'स्वामी' असा नाम-निर्देश केला जातो. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

[ १५७ ]

एकशें छप्पन्न अभंग रचोनि ।
पहाया म्हणोन दिले संतां ॥ १ ॥
संतीं संतोषून डोलविली मान ।
परि एक न्यून दाखविलें ॥ २ ॥
" अनिर्दिष्टनाम काव्य गमे उणें ।
केली मिठाविणें पाक-सिद्धि ॥ ३ ॥
अभंगाशेवटीं नामाचा निर्देश ।
करणें सुयश जोडावया " ॥ ४ ॥
संतांहातीं ऐसा पाठवी निरोप ।
माझा माय-बाप वासुदेव ॥ ५ ॥
संतांचें वचन मानुनी प्रमाण ।
न्यून केलें पूर्ण हरि-कृपें ॥ ६ ॥
लक्षुनी भावार्थ अभंग समस्त ।
पुनरपि साद्यन्त संशोधिले ॥ ७ ॥
अभंगाशेवटीं नामाची योजना ।
केली जनार्दना तोषवाया ॥ ८ ॥
' स्वामी ' म्हणे माझा सखा नारायण ।
कोठें कांहीं न्यून पडों नेदी ॥ ९ ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

स्वामी स्वरूपानंद विरचित

श्रीमत्

क्राउन् साइज् ] # भावार्थगीता [ पृष्ठें १७८

( अध्याय १ ते १८ )

श्रीमद्भगवद्गीतेचा

मुख्यत्वें श्रीज्ञानेश्वरीच्या आधारें केलेला

सुबोध, प्राकृत, टीकात्मक

साकीबद्ध अनुवाद

( सचित्र )

मूल्य ३॥ रुपये

प्रकाशकः—देसाईबंधु

मु. पो. पांवस, जि. रत्नागिरी.

अनुक्रम २७४५८ दि. ३/५५
क्रमांक ९३५८० नों. दि. २७/४/८०

# श्रीमत् भावार्थ गीतेवरील कांहीं अभिप्राय

**श्री. ज. स. करंदीकरः—( केसरी,** पुणें दि. १६-१२-१९५१ ) प्रस्तुतची ‘ भावार्थ गीता ’ पठण करणाऱ्याला गीतेचें तत्त्वज्ञान जाणल्याचें आणि ज्ञानेश्वरीचा रस चाखल्याचें असें दुहेरी समाधान लाभेल.

**श्री. डॉ. शं. दा. पेंडसेः—( प्रसाद,** पुणें जुलई १९५२ ) श्रीमत् भगवद्गीतेचा, स्वामी स्वरूपानंद ह्यांनीं केलेला हा साकीबद्ध अनुवाद प्रसिद्ध होऊन बरेच दिवस झाले. त्याकडे ह्या विषयाच्या रसिक वाचकांचें अद्यापि जावें तितकें लक्ष गेलेलें दिसत नाहीं......गीतेचा भावार्थ स्वामीजींनीं ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेला अनुसरून दिला आहे. त्यामुळें वाचकाला गीता आणि ज्ञानेश्वरी ह्या दोन्ही ग्रंथांचें सार ह्या ग्रंथामुळें कळण्याची सोय झाली आहे...... हा अनुवाद वाचूं लागलों कीं, स्वामी स्वरूपानंदांना त्यांच्या गुरूचा ‘ प्रसाद ’ लाभला आहे, हें सहज लक्षांत येतें. त्यांच्या अनुवादांतील ‘ प्रसाद ’ गुण वाचकांचें चित्त प्रसन्न व शांत करील आणि त्यांतील अर्थ वाचकाला समाधान देईल.

**श्री. मो. दि. जोशीः—( बलवंत,** रत्नागिरी दि. २७-२-१९५२ ) गीतेवर झालेल्या सर्व मराठी टीका व पद्यग्रंथ ह्यांचा अभ्यास केला असल्याचा ठसा ‘ श्रीमत् भावार्थगीता ’ ह्या ग्रंथांत उमटलेला दिसतो. केवळ साहित्य ह्या दृष्टीनें पाहिलें तरी ह्या ग्रंथाची योग्यता निःसंशय वरच्या दर्जाची ठरेल.

पण ह्या ग्रंथाचें महत्त्व ह्यापेक्षांहि अधिक आहे. कारण भावार्थगीतेचे कर्ते हे स्वतः आत्मनिष्ठ साधु आहेत. अध्यात्मवादी ज्ञानी पुरुषाच्या भूमिकेंतून जशा प्रकारचा ग्रंथ निर्माण व्हावा अशी अपेक्षा असते, तशा प्रकारचा हा ग्रंथ आहे, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं.

अंतःकरणांतून सहज स्फूर्तीनें निघालेले उद्गार ह्या पुस्तकांत ग्रथित केलेले आहेत. रसाळ शब्दरचना, लालित्यपूर्ण पद्यरचना आणि सर्व ठिकाणीं आल्हाद-दायक प्रसाद हें ह्या ग्रंथाचें वैशिष्ट्य आहे.

१४४

**प्रा. भागवतः**—( **धर्मचक्र**, मुंबई, जानेवारी १९५२ ) मराठी वाचतां येणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषानें याची एक प्रत विकत घेऊन दररोज यांतील जर पाठांतर केलें तर खात्रीनें तें सर्वांच्या नैतिक निःश्रेयसास व यशस्वी रीतीनें जीवन व्यतीत करण्यास उपकारक झाल्याविना राहणार नाहीं.

‘ **विविधवृत्त** ’:—( **मुंबई**, दि. २८-१०-१९५१ ) गीतेंतील तत्त्वज्ञान सुबोध भाषेंत रसाळपणें मांडण्याचें काम फार अवघड आहे. तें या पुस्तकांत स्वामी स्वरूपानंद यांनीं सुलभतेनें केलें आहे. यावरून गीतेचा त्यांचा खोल अभ्यास आणि पद्यरचनेंतील कौशल्य यांचा वाचकांना चांगला प्रत्यय येतो. गीताभ्यासी वाचकांना हें पुस्तक संग्राह्य आहे.

‘ **मौज** ’:—( **मुंबई**, दि. ३०-७-१९५२ ) स्वामी स्वरूपानंदांचें गीतेचें व ज्ञानेश्वरीचें मनन-चिंतन कित्येक दशकांचें आहे. ज्ञानेश्वरांच्या नाथपंथीय परंपरेंतल्या गणेशनाथ या साधुपुरुषाचा गुरूपदेश त्यांना मिळालेला असल्यानें स्वरूपानंद गीता-ज्ञानेश्वरीवर अधिकारवाणीनें बोलूं शकतात.

**श्री. गोपिनाथ तळवळकरः**—( **मन्वंतर**, पुणें दि. २६-११-१९५१ )
कवि स्वतः भाषापंडित नाहींत, तर आत्मानुभवी सिद्ध आहेत. त्यामुळें साध्या शब्दार्थाच्या पलीकडील गूढ अर्थ त्यांना अवगत आहे. त्याचें प्रतिबिंब ह्या अनुवादांत दिसतें.

‘ **विवेक** ’:—( **मुंबई** )...सर्व अनुवाद मधुर झाला आहे. गीतातत्त्व-चिंतन अंतःकरणात मुरून पुनः साकीरूपानें रसाळ उतरलें आहे.

‘ **श्रीमत् भावार्थ गीता** ’ व ‘ **श्रीमत् संजीवनी गाथा** ’ हे दोन्ही ग्रंथ खालील ठिकाणीं विकत मिळतील.

( १ ) त्रिं. वि. परचुरे, **बलवंत पुस्तक भांडार**, गिरगांव नाका, मुंबई नं. ४

( २ ) वैद्य रा. य. परांजपे, **संजीवन दवाखाना**, बाजार पेठ, रत्नागिरी.

( ३ ) **देसाईबंधु**, मु. पो. पांवस, जि. रत्नागिरी, किंवा ८९४ सदाशिव, पुणें नं. २

REFBK-0009112
REFBK-0009112
मराठी
अनुक्र.
दि.
क्रमां.
पो. दि.